संपादक : प्रा. प्रल्हाद वडेर / नरेन्द्र बोडके

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2334



REFBK-0022149
REFBK-0022149

# स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय मराठी कविता

काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. काव्य 2338
शाखा स्थळ

# स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय मराठी कविता

संपादक :

प्रा. प्रल्हाद वडेर
नरेंद्र बोडके

REFBK-0022149
REFBK-0022149

गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे प्रकाशन

## मंडळाचे मनोगत

'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता' हे पुस्तक गोमंतक साहित्य सेवक मंडळातर्फे प्रकाशित होत आहे. १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा स्वतंत्र झाला. विविध बंधनांत जखडलेल्या गोमंतकीयांना नवे जीवन उपलब्ध झाले. यानंतरच्या कालखंडात गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या साहित्याचे प्रातिनिधिक स्वरूप मराठी रसिकांपुढे व वाङ्मयीन अभ्यासकांपुढे यावे यासाठी गोमंतक साहित्य सेवक मंडळातर्फे 'स्वातंत्र्योत्तर मराठी कथा' व 'स्वातंत्र्योत्तर मराठी कविता' असे दोन संग्रह प्रकाशित करण्याचे ठरले व त्यास कला अकादमी, गोवा यांनी आर्थिक साहाय्य देऊन हे कार्य शक्य केले, याबद्दल कला अकादमीचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

या संग्रहाचे संपादन डॉ. प्रल्हाद वडेर व श्री. नरेंद्र बोडके यांनी मेहनत घेऊन केले. त्यांनी संग्रहाला विवेचक प्रस्तावनाही लिहिली आहे. त्यांचेही मंडळ आभारी आहे. कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर यांनी नेहमीप्रमाणे सुबक छपाई करून पुस्तकाला रंगरूप दिले. त्यांचेही मंडळ आभारी आहे. मराठी साहित्य रसिक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा वाटते.

**माधव गडकरी**

दि. १-१०-७६

कार्याध्यक्ष, गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पणजी, गोवा

पत्रव्यवहाराचा पत्ता :
मेनेझिस इन्स्टिटयूट इमारत, पणजी, ( गोवे ) ४०३००१

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
सदाशिव पेठ
पुणे ३०

प्रकाशक
ॲड्. जयवंतराव सरदेसाई,
अध्यक्ष
गोमंतक साहित्य
सेवक मंडळ
मेनेझिस् ब्रागांझा
इन्स्टिटयूट इमारत
पणजी, गोवा

©
गोमंतक साहित्य
सेवक मंडळ
पणजी, गोवा

स्थापना / १९२८

पहिली आवृत्ती
१९७६

मूल्य
दहा रुपये

या पुस्तकाचा
कागद
महाराष्ट्र राज्य
शिक्षणखात्याने
सवलतीच्या दरात
उपलब्ध करून
दिला आहे.

# दोन शब्द

गोमंतक साहित्य सेवक मंडळातर्फे हा कवितासंग्रह प्रकाशित करताना आम्हा सर्वांना अतिशय आनंद होत आहे. गोवा मुक्तीनंतर गोमंतकीय लेखकांनी लिहिलेल्या कवितांचा हा प्रातिनिधिक संग्रह असून त्यात तरुण कवींना प्राधान्य देण्याचा मुख्यत्वे प्रयत्न केलेला आहे. स्वातंत्र्योत्तर गोमंतकातील मराठी कवितेचे वळणही कोणते आहे याचे दर्शन या संग्रहामुळे घडू शकेल. प्रा. प्रल्हाद वडेर व तरुण कवींतील एक कवी श्री. नरेन्द्र बोडके यांच्याकडे या संग्रहाच्या संपादनाचे काम सोपविले होते. त्यांनी ते व्यवस्थितपणे केल्याबद्दल साहित्य सेवक मंडळ त्यांचे आभारी आहे. एक विवेचनात्मक प्रदीर्घ प्रस्तावना हे या संग्रहाचे एक वैशिष्ट्य ठरावे.

गोमंतक साहित्य सेवक मंडळाची स्थापना १५ डिसेंबर १९२८ रोजी झाली. १९३० मध्ये पंधरावे मराठी साहित्य संमेलन कै. वामन मल्हार जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मडगाव येथे भरले. त्या वेळी 'काव्यकुंज' या नावाचा एक प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला होता व त्याचे संपादन कै. शिवा फट्ट पै आंगले यांनी केले होते. त्यानंतर 'गोमंत-शारदा' हा दुसरा कवितासंग्रह गोमंतक साहित्य सेवक मंडळाने प्रकाशित केला. १५२६ ते १९६५ अशी ४३९ वर्षांतील गोमंतकीय कवितेचे दर्शन या संग्रहाने घडविले. श्री. रामदास प्रभू यांनी त्याचे संपादन केले. त्यानंतर हा तिसरा कवितासंग्रह स्वातंत्र्योत्तर काळात लिहिल्या गेलेल्या मराठी कवितेचा होत आहे.

गोवा कला अकादमीने या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी प्रतींच्या बदल्यात आर्थिक साहाय्य आधी देऊन आमचे काम सोपे केले, याबद्दल कला अकादमीचे साहित्य सेवक मंडळ आभारी आहे. ही पहिली आवृत्ती ११०० प्रतींची आहे. नव्या लेखकांचे साहित्य प्रसिद्ध करण्यास पुढाकार घेण्यात साहित्य सेवक मंडळास धन्यता वाटेल, परंतु त्यासाठी रसिक गोमंतकीय वाचकांनी एकेक प्रत विकत घेतली पाहिजे. हे सहकार्य साहित्य सेवक मंडळास मिळेल अशी खात्री वाटते.

कल्पना मुद्रणालयाचे श्री. लाटकर यांचे सहकार्य हे महत्त्वाचे. त्यांचेही मनःपूर्वक आभार.

**पणजी,** **माधव गडकरी**
दि. १ जानेवारी, १९७७ कार्याध्यक्ष / गोमंतक साहित्य सेवक मंडळ

# प्रस्तावना

गोमंतकीय मराठी कवितेची उपलब्ध परंपरा सोळाव्या शतकापर्यंत मागे जाते. त्यापूर्वी सापडलेले इ. स. १३३९ व इ. स. १३५२ चे जुन्यात जुने मराठी ताम्रपट लक्षात घेतले तर गोव्यातील मराठी भाषेची परंपरा चौदाव्या शतकापर्यंत भिडते. तेरावे व चौदावे शतक हा ज्ञानेश्वर-नामदेवांचा काळ. त्यांनी महाराष्ट्रात एक समृद्ध संतकवितेची परंपरा निर्माण केली. तिचा परिणाम गोव्यावरही झाल्यावाचून राहिला नाही. हे येथे निवृत्ती, ज्ञानदेव इत्यादी नावे धारण करणाऱ्या गोमंतकीय कवींवरून व त्यांच्या त्या परंपरेतील कवितेवरून स्पष्ट होते. गोमंतकीय ज्ञानदेव या कवीचे ‘ द्रोणपर्व ’ आणि ‘ योगवासिष्ठ ’ हे दोन ग्रंथ आता उपलब्ध झाले आहेत. गोव्यात नाथ संप्रदायाचा परिणामही फार मोठा आहे. नाथपंथाची अनेक देवळे गोव्यात ठायी ठायी आढळतात. “नवनाथमध्ये एक नाथ तर ‘ कोकणनाथ ’ या नावाने लोकविश्रुत होता. त्याच्या नावावरून तो कोकणचा असल्याचे स्पष्ट दिसते. कदाचित तो गोव्याचाही असेल,” असे रामदास प्रभू संपादित ‘ गोमंत शारदा ’ या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत बा. भ. बोरकर यांनी म्हटले आहे. आजही गोव्यात सिद्धनाथ, चंद्रनाथ, भूतनाथ, रवळनाथ इत्यादी नाथांची देवळे आहेत. त्यावरून तो संप्रदाय गोव्यात सगळीकडे कसा पसरला होता हे कळून येते. त्यातूनच सोहिरोबानाथ व प्रकाशानंदनाथ हे दोन थोर कवी निर्माण झाले. ज्ञानेश्वर आणि नाथपंथ यांचे संबंध तर स्पष्टच आहेत.

पण गोव्याची ज्ञात मराठी कवि-परंपरा इ. स. १५२६ पूर्वी मात्र नाही. याचे कारण पोर्तुगीजांनी मराठी ग्रंथ जाळले, आणि इतर लोकांच्या अनास्थेने ते नष्ट झाले. म्हणून ज्या कवीपासून ही परंपरा सुरू होते तो कवी म्हणजे पंधराव्या शतकातील कृष्णदास शामा. आपण शके १४४९ वैशाख शुद्ध १३ रोजी, म्हणजे २५ एप्रिल १५२६ रोजी केळोशी येथील शांतादुर्गा देवालयात बसून ‘ कृष्ण-विजय ’ हा ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली असा उल्लेख त्याने आपल्या ग्रंथातच केला आहे.

एकनाथांनी भागवतावरील आपली टीका लिहिण्यापूर्वी ४७ वर्षे कृष्णदास शामाने आपला ग्रंथ रचला. यावरून पंधराव्या शतकात मराठी संतसाहित्य गोव्यात कसे घरोघर पोहोचले होते, हे कळते. फादर स्टीफन्स या ख्रिस्ती धर्मोपदेशकाने आपला ‘ ख्रिस्तपुराण ’ हा ग्रंथ मराठी संतांची परंपरा पुढे ठेवूनच रचला; व त्याने

स्वतःला ख्रिस्तदासु असेही म्हणवून घेतले. इतकेच नव्हे तर आपल्या पुराणाच्या प्रत्येक अध्यायाची समाप्ती करतानाही तो 'इति श्री...' असे म्हणून शेवटी 'शुभं भवतु' असेही लिहितो. ( ख्रिस्त पुराणाच्या छापील प्रतीत हा भाग वगळला गेला आहे. पण तो मूळ प्रतीत आहे. )

फादर स्टीफन्सनंतर एतिसां द ला क्रुला या फ्रेंच पाद्र्याने इ. स. १६२९ मध्ये सेंट पीटरवरील पुराण लिहिले, तर इ. स. १६५९ मध्ये पोर्तुगीज पाद्री आंतोनियु द सालदांज याने सांतु आंतोनीची जीवित्वकथा हा ग्रंथ रचला. सतराव्या शतकात काही ख्रिस्ती द्वैत्रिनीही मराठीत लिहिल्या गेल्या, यावरून केवळ हिंदूंनीच नव्हे तर ख्रिस्ती धर्मीयांनीही गोव्यात मराठीची परंपरा चालविल्याचे दिसून येते. कै. पांडुरंगबाबा पिसुर्लेकर व कै. अ. का. प्रियोळकर या दोन गोमंतकीय विद्वानांनी मराठी कवितेची ही ख्रिस्ती परंपरा प्रकाशात आणून फार मोठे कार्य केले आहे.

सतराव्या शतकात शंकर मंगेश नायक करंडे ( ऊर्फ नायकस्वामी ) यांनी रचलेल्या शिवलीलेवरील टीकेचा व स्फुट कवितेचा उल्लेख केला पाहिजे. त्यांनीच गोमंतकात मोरोपंती आर्या प्रथम आणली. अठराव्या शतकात महेश्वरभट्ट सुखटणकर यांची अमरकोशावरील मराठी टीका ( इ. स. १७५० ), गीतगोविंदवरील मराठी प्रतिकृतीसह विवरण, सोहिरोबांचे सिद्धान्त संहिता व अद्वयानंद पूर्णेश्वरी हे ग्रंथ आणि विठ्ठल नरसिंह केरीकरकृत शुकरंभा संवाद, कबीर कथा, वामनचरित्र यांच्या रचना झाल्या. केरीकर यांच्या 'घनःशाम सुंदरा' या भूपाळीवरूनच होनाजी बाळाने आपली त्याच नावाची प्रसिद्ध भूपाळी रचली असे आता कै. शिवा फट्ट आंगले, आणि दा. अ. कारे यांनी सिद्ध केले आहे. त्याची दखल मराठी समीक्षकांना घ्यावी लागेल.

एकोणिसाव्या शतकातील लक्ष्मण पांडुरंग केंकरे यांची अमरकोशावरील टीका व पांडबा केसरे यांचे द्रौपदी स्वयंवर या महत्त्वाच्या रचना. याच काळात म्हणजे इ. स. १८७२ मध्ये मुद्रणकलेचा प्रवेश गोमंतकात झाल्याने ग्रंथरचनेला अधिकच जोर आला. कृष्ण जगन्नाथ बोंदकर ( ज्यांनी कै. अण्णासाहेब किर्लोस्करांना नाट्य-निर्मितीची प्रेरणा दिली. ), हिरबा नाईक सरदेसाई व रामचंद्र पांडुरंग वैद्य हे या शतकातील महत्त्वाचे कवी. हिरबा नाईक सरदेसाई यांचे सारीपाट काव्य, ध्रुवा-ख्यान आणि रामचंद्र पांडुरंग वैद्य यांची काव्यतरंगिणी हे नाव घेण्याजोगे काव्यग्रंथ या काळात निर्माण झाले. एकोणिसाव्या शतकापर्यंतची गोव्यातील कवितेची परंपरा ही भक्ति-ज्ञान-वैराग्यपर आहे. इतिहास, पुराण, रामायण-महाभारत इत्यादी महाकाव्ये

यांतून तिने प्रेरणा घेतल्या. महाराष्ट्रातील मराठीची काव्यधाराही याहून वेगळी नाही. पोर्तुगीजांच्या जुलूम-जबरदस्तीखालीसुद्धा तिला खंड पडला नाही. याच काळात गोव्यात एक शाहीर कवीही निर्माण झाला. त्याचे नाव गोंदजी नाईक. त्याने दिपाजी राणीच्या बंडाला शाहिरी मुजरा करून साथ दिली. आजही सत्तरीच्या परिसरात त्याचे पोवाडे आदराने म्हटले जातात असे सांगण्यात येते.

गोमंतकीय मराठी कवितेच्या एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या परंपरेचा थोडक्यात आढावा घेतल्यानंतर विसाव्या शतकाकडे जेव्हा आपण वळतो, तेव्हा विद्यमान गोमंतकीय कवींच्या चार-पाच तरी पिढ्या आज काव्यलेखन करताना दिसतात. त्यातील पहिली पिढी ही अर्थातच दामोदर अच्युत कारे व बा. भ. बोरकर यांची. त्यांच्या पूर्वीच्या पिढीतील ज. घ. मळकर्णेकर, यशवंत सूर्यराव सरदेसाई ऊर्फ भाई देसाई, दादा वैद्य इत्यादी मंडळी काळाच्या पडद्याआड गेली आहेत, तर वि. स. सुखटणकर, वि. का. प्रियोळकर या त्याच पिढीतील कवींनी आता काव्य-लेखन सोडले आहे. गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे चिटणीस शिवा फट्ट पै आंगले यांनी मडगाव येथे १९३० साली भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या वेळी ‘ काव्यकुंज ’ या नावाचा एक प्रातिनिधिक संग्रह प्रकाशित केला होता. त्यात यशवंत सूर्यराव सरदेसाई, अ. का. प्रियोळकर, सगुण प्रभू मोसे, सौ. लीलावती तारकर पेडणेकर, बाळकृष्ण अनंत बाळे, सा. घं. कंटक, भीमाजी मुकुंदराव देशपांडे ( वज्रदेही ), विश्वनाथ कामत आजरेकर, अनंत राया शिरवईकर, दत्ता तारकर पेडणेकर, वामन वासू नाईक, भगवंत भास्कर केणी इत्यादी कवींचा समावेश होता. त्याचा दुसरा भाग प्रसिद्ध होणार असल्याचे संपादकांनी प्रस्तावनेत म्हटले होते, पण तो प्रसिद्ध झालेला दिसत नाही. त्यातील काहीजण अजूनही हयात असले तरी काव्यदृष्ट्या ही गोमंतकातील जुनी पिढी आता इतिहासजमा झाली आहे.

त्यामुळे गोमंतकात आज ज्या चार किंवा पाच कवींच्या पिढ्या काव्यलेखन करताना दिसतात त्यांतील ज्येष्ठ पिढीचे प्रतिनिधित्व कारे व बोरकर हेच करताना दिसतात. त्यांपैकी कारे यांचा ‘ नंदादीप ’ हा संग्रह १९३४ मध्ये प्रकाशित झाला. याच पिढीतील संतवाङ्मयाचे गाढे अभ्यासक व मराठीतील व्यासंगी व ‘ चिकित्सक ’ टीकाकार पुरुषोत्तम मंगेश लाड यांचा ‘ मधुपर्क ’ हा कवितासंग्रहही १९४३ मध्ये प्रसिद्ध झाला. त्यांच्या अकाली निधनाने गोमंतकीय मराठी कवितेचे फार मोठे नुकसान झाले यात शंका नाही.

कारे, बोरकर यांच्यानंतर काव्यलेखन करणाऱ्या कमीत कमी चार पिढ्या तरी दिसतात. त्यांत शंकर रामाणी व वि. ज. बोरकर यांचा त्यांच्या वयात काही फरक

असला तरी एकाच पिढीत अंतर्भाव करावा लागेल. तिसऱ्या पिढीत रामदास प्रभू, हिरालाल कामत यांचा समावेश होतो. त्यानंतरच्या पिढीत नरेंद्र बोडके, प्रकाश पाडगावकर, बा. सा. पवार, श्रीकांत कासकर, शरच्चंद्र देशप्रभू, नीलिमा आंगले यांचा अंतर्भाव केला तर अनिल सामंत, माधुरी मुंज, नयना गुरव, शिवानंद तेंडुलकर, दशरथ परब यांचा अगदी ताज्या नव्या पिढीत समावेश केला पाहिजे. यांपैकी अनेक कवि-कवयित्री अजून कॉलेजात शिक्षण घेत आहेत. याबरोबरच गोमंतकात व्यवसाय किंवा शिक्षणाच्या निमित्ताने स्थायिक झालेल्या व आता गोमंतकीयच झालेल्या प्रा. मुरलीधर कुलकर्णी, प्रा. विजय सातपुते, वसंत वैद्य, द्वारकानाथ शेण्डे, शरद नरेश, बा. सा. पवार, श्रीकांत कासकर यांचे कवितालेखन लक्षात घेतले तर स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय कवींचे समग्र चित्र डोळ्यांपुढे उभे राहते.

या संग्रहातील ८०–९० कवितांकडे प्रत्यक्ष वळण्यापूर्वी काही गैरसमजांचे निराकरण करणे आवश्यक आहे. त्यांपैकी पहिला म्हणजे गोमंतकीय मराठी कवितेत खास असा काही वेगळेपणा आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर अर्थातच तशी काही फार वेगळी वैशिष्ट्ये आढळत नाहीत, हेच आहे. प्रत्येक विभागाची प्रादेशिक वैशिष्ट्ये असतात आणि तिथल्या हवा, पाणी, जमीन इत्यादींमुळे जसे झाड पोसले जावे तसे तिथल्या माणसांवरही काही परिणाम होतात हे काही प्रमाणात खरे असले तरी सबंध देश व कोकणवर ते परिणाम जवळ जवळ सारखेच दिसतात. बा. भ. बोरकरांच्या कवितांत गोमंतकीय निसर्गाची काही वैशिष्ट्ये व तपशील आले आहेत. पण शंकर रामाणी यांच्या कवितांत मात्र त्यांचा पूर्णपणे अभाव आहे. त्यामुळे गोमंतकीय मराठी वाङ्मयात मराठी वाङ्मयाहून काही निराळी वैशिष्ट्ये आली आहेत असे नाही. पं. महादेवशास्त्री जोशी यांचेसुद्धा हेच मत आहे. राजकीय दृष्ट्या भिन्न राजवटीमुळे तो अलग पडल्याने मराठी वाङ्मयनिर्मिती करणारा जो हिंदु-समाज तो महाराष्ट्रातील हिंदुसमाजाहून भिन्न म्हणण्यासारखा नाही असे 'आजचा व कालचा गोमंतक' या गोवा हिंदू असोसिएशनने आपल्या रौप्य महोत्सव प्रसंगी प्रसिद्ध करण्यात आलेल्या ग्रंथातील 'गोमंतकीय मराठी वाङ्मय' या लेखाच्या अनामिक लेखकाने म्हटले आहे. आणि "वाङ्मय हा समाजजीवनाचाच आविष्कार असल्याने अधूनमधून समाजातील सांस्कृतिक देवघेव नेहमीच अविच्छिन्नपणे चालत आली असल्याने दोन्ही समाज (गोमंतक व गोमंतकबाह्य) एकाच पातळीवर आहेत असे म्हणावयाला हरकत नाही. मात्र महाराष्ट्राच्या मुख्य शहरांपासून दूर अशा सीमान्त प्रदेशातील तो असल्याने समाजजीवनातील मुख्य-मुख्य घटनांना केंद्रस्थानीच

जास्त अवकाश असतो ही गोष्ट लक्षात घेता गोमंतकीय सांस्कृतिक जीवन व तदनुसार गोमंतकीय वाङ्मय यांचा दर्जा शहरी महाराष्ट्रीय वाङ्मयाच्या मानाने दुय्यम प्रतीचा असणार हे उघड आहे व त्यात कमीपणा मानण्यासारखे काही नाही ", असे या अनामिक लेखकाने पुढे म्हटले आहे.

या उलट तक्रार रामदास प्रभू यांनी आपल्या 'गोमंत शारदा' या गोमंतकातील इ. स. १५२६ ते १९६५ या कालखंडातील प्रातिनिधिक कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत केली आहे : " इकडच्या कवितेची समीक्षा करताना समीक्षाकारांनी ह्या कवितेवर सतत अन्याय केला आहे...गोव्याबाहेरील समीक्षाकाराला येथील परंपरेचा अर्थ व अन्वय अपरिचित होता. ती समजून घेण्याचा प्रयत्न झाला नाही. म्हणूनच महाराष्ट्राच्या इतर कवितेच्या बरोबरीनेच हीही कविता जोखण्यात आली. वास्तविक गोमंतकाच्या कवितेचे परीक्षण करताना तिच्यावरचे वेगळे संस्कार, वेगळ्या राजवटीचे परिणाम, वेगळ्या पण समृद्ध अशा निसर्गाचा परिणाम आणि येथील वेगळ्या परंपरा या सर्व गोष्टींच्या प्रभावाने बनलेल्या येथल्या कवितेच्या वेगळ्या स्वरूपाचे चिकित्सक आकलन करून घेऊनच नंतर मूल्यमापन झाले पाहिजे," असा त्यांचा आग्रह आहे.

'आजचा व कालचा गोमंतक' मधील 'अनामिक' लेखक व रामदास प्रभू यांनी व्यक्त केलेले वरील मत ही दोन्ही विधाने गैरसमजावर आधारलेली व म्हणूनच चुकीची आहेत. पुण्या-मुंबईच्या तुलनेने प्रसिद्धीची साधने गोव्यात कमी उपलब्ध असतात, व त्यामानाने पुण्या-मुंबईच्या लेखकांना झुकते माप मिळते अशा तक्रारीही महाराष्ट्राच्या इतर भागांतून मधूनमधून केल्या जातात. दुसरे म्हणजे महाराष्ट्रीय साहित्याच्या मानाने गोव्यातील वाङ्मयनिर्मिती मुळीच दुय्यम दर्जाची नाही हे बोरकर-रामाणी यांसारख्या कवींनीच यापूर्वी सिद्ध केले आहे. मराठी कविपरंपरेचा धागा या सर्वच कवींत बळकट आहे, आणि ती पूर्वपरंपरा पचवूनच त्यांनी तिच्यात आपली स्वतःची नवी भर घातली आहे. म्हणून गोमंतकीय साहित्यावरील दुय्यम दर्जाचा आरोप आपोआपच खोडला जातो.

रामदास प्रभू यांच्या समीक्षकांनी गोमंतकीय साहित्यावर अन्याय केल्याच्या आरोपालाही वरील वस्तुस्थितीमुळे परस्परच उत्तर मिळून जाते. येथील परकीय राजवट, परंपरा, वेगळे संस्कार, समृद्ध निसर्गाच्या सान्निध्याचा परिणाम या सर्व गोष्टींमुळे येथे निर्माण झालेल्या कवितेचे वेगळेपण नक्की कशात आहे हे रामदास प्रभूंना सांगता आलेले नाही व ते कोणाला सांगता येईल असेही वाटत नाही. याचे कारण तसे वेगळेपण मुळातच नाही हे होय. एक बोरकर सोडले तर इतर

कोणत्याही गोमंतकीय कवींत हा वेगळेपणा दिसत नाही, आणि बोरकरांतही तो वेगळेपणा दिसतो तोही गोव्यातील निसर्गाच्या काही तपशिलात. बोरकरांच्या काव्यावरचे पहिले संस्कार भा. रा. तांबे यांचे होते हे समजून घेतल्यावर त्यांच्या कवितेतील ताल आणि सूर यांचा संबंधही केवळ गोव्यातील परंपरेशीच लावता येणार नाही. म्हणूनच गोव्याच्या कवितांबाबतही मराठी कविपरंपरेचे सूत्र स्पष्ट आहे. ' महाराष्ट्र कवि-परंपरा । खंड न पडला तिला जरा । ' हे जितके येथील कवितेबाबत खरे, तितकेच इथे रसिकांची उणीवही कधीच नव्हती, हेही खरे आहे!

आणि हा कवितेचा वेगळेपणा व वेगळे संस्कार ही वैशिष्ट्ये तरुण पिढीच्या कवितेतही अधिकाधिक कमी होत आहेत, हे या कवितासंग्रहावरून दिसून येण्यासारखे आहे. आज सर्वच मराठी कवितेचा तोंडवळा काहीसा एकसारखा होत आहे. आणि त्याला गोव्यातील तरुण कवि-कवयित्रीही अपवाद नाहीत. आजच्या इंग्रजी कवितेच्या बाबतीतही हे खरे आहे, असे त्या कवितेचे अभ्यासक सांगू शकतील. त्यामुळे गोव्यातील कवितेच्या बाबतीत काही वेगळी मूल्ये निर्माण करावी, मराठीच्या कवितेवरून ती जोखू नये हा असाच एक गोड गैरसमज आहे, असे स्पष्टपणे सांगणे भाग आहे.

स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय कवितेच्या या प्रातिनिधिक संग्रहाला जो अपूर्व प्रतिसाद मिळाला, त्यावरून येथील मराठी कवितेच्या परंपरा कारे, बोरकर, रामाणी, वि. ज. बोरकर यांच्यापर्यंतच येऊन संपते असे भाकित उत्साहाने दर्शविणाऱ्या काही ज्योतिषांचीही पंचाईत होणार आहे. या संग्रहातच वरील कवीनंतरचे किती तरी तरुण कवि-कवयित्री दिसतात. गोव्यातील स्वातंत्र्योत्तर काळात लिहिल्या गेलेल्या कवितांचा हा प्रातिनिधिक संग्रह आहे. दा. अ. कारे, बा. भ. बोरकर, शंकर रामाणी, वि. ज. बोरकर, रामदास प्रभू असे काही कवी सोडले तर इतर सर्व कवींच्या कवितांची निवड करताना प्राधान्य कवींना नसून कवितांना दिलेले आहे. गेल्या चौदा-पंधरा वर्षांत ज्या कवितेने एक नवा सच्चा सूर व वेगळेपणा दाखविला, स्वतःचे वेगळे वैशिष्ट्य दाखविले तिला इथे आवर्जून स्थान दिलेले आहे. मग तसे करताना तो कवी प्रथितयश की नवोदित, ज्येष्ठ की कनिष्ठ असल्या उपऱ्या कसोटयांचा विचार केलेला नाही. आणि तसे करताना तरुण रक्तालाही वाव दिलेला आहे. या जवळ जवळ ९० कवितांतील ६०–७० कविता आजच्या या अगदी तरुण कवींच्याच आहेत. त्यामुळे गोव्यातील जुन्या आणि नव्या पिढीतील एखादे दुसरे परिचित नाव या संग्रहात रसिक वाचकांना न आढळणे शक्य आहे.

सर्वश्री दा. अ. कारे आणि बा. भ. बोरकर ह्या एकाच पिढीतील दोन कवींत तसे कुठलेच साम्य नाही. काऱ्यांची कविता नंदादीपासारखीच स्निग्ध व सौम्य आहे. 'कल्पनाविलास, सुरम्य सत्त्विक भावना, अकृत्रिम निसर्गभक्ती, अंतःकरणपूर्वकता व प्रसाद' असे त्यांचे चार गुण त्यांच्या 'नंदादीप' या १९३४ मध्ये प्रकाशित झालेल्या संग्रहाच्या प्रस्तावनेत वा. म. जोशी यांनी सांगितले होते. ते किती मार्मिक आहेत हे त्यांच्या आजवरच्या सर्वच कवितांवरून जाणवते. बोरकरांच्या कवितेला चिरतारुण्याचे वरदान आहे, आणि तिची धुंदी अवीट आहे. त्यांच्या नंतरच्या पिढीतील शंकर रामाणी यांची कविता त्यांच्या 'आभाळवारा' या १९६७ मध्ये प्रकाशित झालेल्या संग्रहानंतर अधिकाधिक समृद्ध होत चालल्याचे त्यांच्या असंग्रहित (अद्याप) कवितांवरून जाणवते. एखादी साधना करावी तशी त्यांची कविता निष्ठेने आणि एकाकीपणे वाटचाल करीत आहे. वि. ज. बोरकर आणि रामदास प्रभू यांपैकी फक्त प्रभूंचा 'शब्दुली' हा संग्रह प्रकाशित झाला आहे. वि. ज. बोरकरांचा संग्रह झालेला नसला तरी या दोन्ही कवींनी ज्या अपेक्षा निर्माण केल्या आहेत त्या महत्त्वाच्या आहेत. द्वारकानाथ शेंडे यांचेही 'कोंभ' आणि 'मृदंगी' हे दोन संग्रह प्रकाशित झाले आहेत, आणि अजूनही त्यांची कविता आपला विकास करीत आहे.

या कवींबरोबरच बाकीच्या उरलेल्या कवींची संख्या फार मोठी आहे आणि ती सर्व तरुण व काही तर अजून शाळा-कॉलेजात शिकत आहेत. त्यांपैकी प्रा. मुरलीधर कुलकर्णी, शरद नरेश, प्रा. विजय सातपुते इत्यादी कवींचा वेगळा विचार केला पाहिजे. त्यांच्याहून इतर कवींभोवतालचे वातावरण, महाविद्यालयात त्यांना मिळणाऱ्या संधी आणि त्यांच्यावर होणारे संस्कार यांत मूलतः फरक आहे. बहुसंख्य विद्यार्थी हे परंपरागत लेखन करणारे असतात. त्यात अनुकरणाचा भागही मोठा असतो. नवी प्रयोगशील साहित्य देणारी नियतकालिके ही कविमंडळी बहुधा वाचत नाहीत. पुण्या-मुंबईच्या चांगल्या चांगल्या कॉलेजांतूनसुद्धा ही स्थिती आढळते. गोमंतकात ती तशी आढळली तर नवल नाही.

पण सुदैवाने गोमंतकातील सर्वच कवी असे नाहीत. या संग्रहातील कवितांवरून गोव्यातील तरुण कवि-कवयित्रींनी मराठी कवितेत आज होत असलेले नवे नवे प्रयोग डोळसपणे पाहिले आहेत असे आढळून येते. त्यांच्यातील आशयाचे, अभिव्यक्तीचे व प्रतिमासृष्टीचे वरवर जरी अवलोकन केले तरी त्याची साक्ष पटेल.

या कवितांचा एक विशेष म्हणजे त्यांपैकी फार थोड्या प्रेमकविता आहेत. वास्तविक नव्या व विशेषतः कॉलेजातील तरुण कवींचा फार मोठा भाग प्रेमकविता

असणे साहजिक आहे. पण ही गेल्या एक तपातली कविता वाचीत असताना त्यात हळवी, सांकेतिक प्रेमकविता फार थोडी आढळते हे फार सूचक आहे. आपल्या समाजात स्वातंत्र्योत्तर काळात घडून आलेल्या नव्या सामाजिक आर्थिक व राजकीय स्वरूपाच्या अन्यायाचा तीव्र निषेध करणारी कविता आजचे तरुण कवी लिहीत आहेत ही त्यांच्या जिवंतपणाचीच खूण आहे. मोठ्या माणसांनी हे जग इतके बिघडून टाकले आहे की, आता ते मोडीतच काढले पाहिजे असे त्यांना वाटते. 'बाप' या संस्थेबद्दलसुद्धा आता तरुणांना फारसा आदर राहिलेला नाही. त्यांची ही चीड खरी आहे. आणि ती शुद्ध द्वेषाच्या रूपाने उत्कटपणे व्यक्त होते. अर्थात चंद्र-चांदणे, सागर-तारे, लहरी-लाटा यांचा भाव अगदीच काही कोसळलेला आहे असे मात्र नाही.

तुझी आठवण काढून काढून फुलं सुकली...कळलंच नाही
तारे मोजता मोजता रात्र निघून गेली...कळलंच नाही

(अवधूत कुडतरकर/तुझी आठवण काढून)

किंवा

बहरल्या वाटा
मन केवड्याचं बन
डोळियांच्या डोही
डोलते चंद्रकोर

(केणी/बहरल्या वाटा)

असे त्याचे काही नाजूक आविष्कार दिसतात. बा. सा. पत्रार यांच्या 'तू सहज विसरशील सारे' यातील दुखावलेल्या प्रियकराची वेदना उत्कट आहे व ती त्यांनी हळुवारपणे व्यक्तही केली आहे.

तू तशीच येशिल मिठीत माझ्या पुन्हा
तो तसाच येईल अजूनि गंध फुलांना
पण दोन मनांच्या वाटा दोन दिशांना
पडलेल्या उल्का पुन्हा न होतिल तारे
तू सहज बोललिस सहज विसरशिल सारे

शशिकांत सरदेसाई यांची 'स्मृति' 'अशीच एक संध्याकाळ' मुरलीधर

कुलकर्णी यांची आठवण, शिवानंद तेंडुलकरांची ‘ थुई थुई ’, बा. सा. पवार यांची ‘सूरच जुळला नाही’, वि. ज. बोरकरांची ‘ सांध्य प्रकाशात ’, श्रीकांत कासकरांची ‘ काळोखता ’ अशा काही कवितांत प्रेमभावना विविध वळणांनी व्यक्त होताना दिसते.

पण या शृंगाररसाच्या माथ्यावर करुणरसाने खरोखरच पाय ठेवलेला दिसतो! ही व्यथा कधी वेदनेतून, कधी अन्यायातून, कधी चिडीतून, उपरोध-उपहासातून अशी निरनिराळ्या वाटांनी व्यक्त होते. व्यथेचे हे आजच्या कवींना वाटणारे आकर्षण सांकेतिक मात्र नाही, हे विशेष. श्रीकांत कासकर यांना सगळीकडे ‘ आकाश सोहळे ’ दिसतात. गजानन जोगांना ‘ आयुष्याच्या खोबऱ्याची गद्य कविता ’ सुचते. द. वा. तळवणेकरांना ‘ आमचे डोहाळेच दरिद्री ! ’ असे वाटते. भयाण काळोख्या विहिरीच्या खबदाडीत क्षुद्र जीवन जगणाऱ्या ‘ टॅंटलस ’मध्ये शरच्चन्द्र देशप्रभूंना आजच्या मानवी जीवनाचे भयानक रूपक दिसते; तर प्रकाश पाडगावकरांना ते कावळ्यात. अशीच तिची आणखी काही रूपे सीताराम शेटये, परशुराम पाटील, माधुरी मुंज, इत्यादी कवि-कवयित्रींच्या कवितांतून आढळतात. त्या सर्व मुळातूनच वाचायला हव्यात.

आजच्या नव्या तरुणांच्या पिढीतील नरेंद्र बोडके, सु. म. तडकोडकर, नयना गुरव, अनिल सामंत आणि शिवानंद तेंडुलकर यांच्या कविता वाचल्यानंतर त्यांच्याबद्दल फार मोठ्या अपेक्षा निर्माण होतात. त्यात विजय सातपुते व शरद नरेश यांचाही अंतर्भाव केला पाहिजे. सातपुते यांच्या कवितेतून संतप्त तरुणाचे होणारे दर्शन एका दृष्टीने प्रातिनिधिक आहे. शरद नरेश यांच्या ‘ गाभारा ’ या कवितेतील रचनाबंधाचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. तडकोडकर, बोडके व सामंत यांच्या कवितेतही आकृतिबंध असेच लक्षणीय वाटतात. तडकोडकरांची ‘ कॅशियाची मैफल ’, बोडके यांची ‘ सैगल ’, अनिल सामंत यांच्या ‘ वारूळ ’ व ‘ कळप ’, नयना गुरव यांची ‘ साऱ्या शपथा नाकारून ’, शिवानंद तेंडुलकर यांची ‘ नाटक ’ या काही कविता वाचल्या की बोरकर-रामाणी यांच्या नंतरच्या नव्या पिढीतील नवे कवी दिसू लागतात. या सर्वच कवींच्या कवितांचा येथे तपशील-वारपणे परामर्श घेणे केवळ अशक्य आहे.

या संग्रहात काही निराळ्या प्रकारच्या कविताही आहेत. नीलिमा आंगले यांची मुलांच्या इतकीच ताजी बालगीते, कै. शहाजी साखळकरांचे आर्त अभंग, रामदास प्रभू, प्रकाश नाईक, विष्णू घुर्डीकर यांची निसर्गचित्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्याच-बरोबर या संग्रहातील कवितांतून व्यक्त होणारी प्रतिमासृष्टीही किती विविध आहे

हे कळून येते. उदाहरणार्थ सहज लक्षात राहिलेल्या काही प्रतिमा अशा आहेत : काजव्यांची काळोख गाणी, वेदनेच्या दिंड्या वाहून नेणाऱ्या वाटा (श्रीकांत कासकर); उसळत्या लाव्हाच्या प्रदेशात दरवळणारा भुईचाफ्याचा गंध ( अवधूत कुडतरकर ); सागराच्या फणा, नंदुल्या पावलांनी रेंगाळणारी निशा ( विष्णू राम कुर्डीकर ); डोळ्यांतली भुकेकंगाल स्वप्नं, आयुष्यव्याप्त दिशांचे कोसळलेले विकीर्ण कडे (मुरलीधर कुलकर्णी ); सिकू लीव्ह घेणारी दुःखं ( वि. श्री. ठाकूर ); काळोखाचे दिशाहीन गाणे ( नयना गुरव ); विवस्त्र चांदण्याचे तुफान ( शिवानंद तेंडुलकर ); शुचिर्भूत किनारे ( शरद नरेश ); घरावर कोसळणारी प्रखरशी रात्र ( वि. ज. बोरकर ); न्हात्याधुत्या दिशांचा दर्बारलेला चव्हाटा, ओठावर उतू आलेले उन्हाळे, तटाच्या तळाशी लागलेले दिवे ( शंकर रामाणी ); लखलखणारे धारदार सूर, झरझर चिरत जाणारा गहिरा काळोख, चांदण्याचं भुरभुरणारं जावळ कुस्करीत अंगाईत न्हाणारी भिजणारी रात्र, वात्सल्याची मोरपिसे ( अमिता रायकर ); जीव अपुरे वाटावेत असे हिवाळ्यातल्या हिरव्या उन्हाचे डोळे, दहा सूर्योदय न्हावेत अशा व्याकुळ दिशा ( विजय सातपुते ); ओलावल्या गालांची कोमजलेली फुलं (अनिल सामंत); आत वहात येणारे अस्पर्श वितळत्या उन्हाचे घर, सैगलच्या स्वरासारखे मेंदूतील काळोखाच्या झाडांचे अरण्य ( नरेंद्र बोडके ) वगैरे प्रतिमा पाहिल्या तर या तरुण कवि--कवयित्रींनी मराठी कवितेतील नवे प्रयोग व प्रवाह यांच्याशी आपले धागे जुळविलेले आहेत हे स्पष्ट होते.

नव्या गोमंतकीय कवींच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनविषयक विचारधारेचाही या ठिकाणी विचार करणे उचित ठरेल. जीवनातील सत्ये स्वीकारणारी डोळस दृष्टी या कवींच्या ठायी आहेच पण झपाटलेल्या अनुभूती अगदी वेगळ्या पातळीवरून मांडणारे कवीही यात आहेत. ‘ आयुष्याच्या खोबऱ्याची गद्य कविता’ या गजानन जोगांच्या कवितेतील या ओळी पहा :

> या टकलासारखंच जर मनही गुळगुळीत असतं
> फार बरं झालं असतं, तुकतुकीत हसता आलं असतं
> झापडे ओढली डोळ्यांवर की आत पाणी आलं नसतं.

आयुष्याचे खोबरे होत चाललेलेही पाहताना अशी सहजता व अलिप्तता बाळगण्यासाठी मनही मोठे असावे लागते. अशा मोठ्या मनातील वादळातूनच

> बिसरणे हेच खरे आयुष्याच्या सरणावर उभे असताना

( श्रीकांत कासकर : काळोखता )

अशा ओळी येऊ शकतात. हीच अलिप्तता व सहजता पुढे शिवानंद तेंडुलकरांच्याही कवितेत दिसून येते. मात्र त्यांच्या कवितेत या दोन घटकांबरोबरच 'चालू' भाषेचा एक नमुनाही व्यक्त होत असतो.

> तर, लाईफमधील सुखदुःखाचा गोवर्धन पर्वत
> आम्ही खुशाल करंगळीच्या बोटावर धरून आध्यात्मिक वगैरे
> भंकस गोष्टींवर चळचळा मुततो हेही तेवढेच खरे आहे
>
> (शिवानंद तेंडुलकर : नाटक)

यातील भाषेचा बदल गृहीत धरूनही आम्हांला अभिप्रेत असलेली अलिप्तता व सहजता या दोन गोष्टीही विशेषत्वाने जाणवतात. ज्यांची प्रकृती जरा गंभीर आहे व जे जीवनाकडे चिंतनशील दृष्टीने पाहात असतात अशा कवींत सीताराम शेटये, चित्रसेन शबाब, अनिल सामंत, तुकाराम रामा शेट आदींचा समावेश करणे आवश्यक ठरेल. नरेंद्र बोडके यांच्या कवितेतील काळोखाच्या प्रतिमा व जीवनाविषयीचे चिंतन लक्षणीय असे आहे.

ज्यांनी गोमंतकीय समाजजीवनाचा अभ्यास केला आहे त्यांना इथल्या लोकांची जीवनाला सामोरे जातानाची सहजता विशेषत्वाने जाणवते. कविवर्य बा. भ. बोरकरांच्या घरात दारावरच 'आयूजम्हाका, फाल्या तुका' अशी ओळ आहे. जीवनाबरोबर चालताना मरण गृहीतच धरून राहण्याची (व तेही अतिशय सहजतेने) ही वृत्ती अंगी बाणविणे अतिशय कठीण आहे. बोरकरांनी ही गोमंतकीयांची परंपरागत वृत्ती जपली, जोपासली व आजही सर्व गोमंतकीय कवींच्या कवितेत या वृत्तीचे पडसाद कसे उठलेले आहेत हे वर सोदाहरण दाखविलेलेच आहे. गोव्याबाहेरून आलेल्या पण गोव्यात स्थायिक झालेल्या कवींच्या काव्यवृत्तीवरही या परंपरेचा खोल व संमिश्र परिणाम झालेला दिसून येतो. समाजजीवनाच्या प्रादेशिक परंपरेची वैशिष्ट्ये या कवितांतही दिसून येतात ती अशी संमिश्र व तरल स्वरूपात. कवितेच्या बाह्यांगावरून तिच्यावर प्रादेशिक अथवा अप्रादेशिकतेचे लेबल मारणे चुकीचे ठरेल.

आणखी एका आजवर कधीही विचार न झालेल्या गोष्टीचा येथ उल्लेख करावासा वाटतो. मराठीतील सर्वच नवे कवी काळोखाच्या विविध प्रतिमांचा आपल्या कवितांमधून वेगवेगळ्या भावना चित्रबद्ध करण्यासाठी वापर करीत असतात. या संग्रहातील कवितांतही काळोखविषयक चिकार प्रतिमा आहेत. काळोखाची वेगवेगळी रूपे त्यातून वेधकतेने प्रकट झालेली आहेत. 'ही सगळीच काळोखता—

शरीर वेढून राहिलेली ' असा उल्लेख श्रीकांत कासकर यांच्या कवितेत येतो. तर पुढे, ' खिडकीच्या डोळ्यांतील रात्रकाळोख फाटलेले;' ' कोसळले काळोखाचे कडे ' ( मुरलीधर कुलकर्णी ), ' दिशाहीन काळोखाचे गाणे गात येणारा एक माणूस ' ( नयना गुरव ), 'काळोखात मी, माझ्यात काळोख' ( शिवानंद तेंडुलकर ), 'घुसळलेला विक्राळ काळोख ' ( शरद नरेश ), ' ज्या देह माखतो एक शून्य अंधार' ( दशरथ परब ), ' जाणिवेच्या पलीकडे सारा अंधार–अंधार ' ( रामदास प्रभू ), ' गाण्यांच्या काळोख खोल गुहा, सैगलच्या स्वरांसारखे मेंदूतील काळोखाचे अरण्य; पान पान जळत जाणारा काळोख ' ( नरेंद्र बोडके ), ' सुगंधाच्या कळ्यातली अंधाराची खूण ' ( वि· ज. बोरकर ), ' झरझर चिरत जाणारा गहिरा काळोख ' ( अमिता रायकर ), ' आठवांच्या घनदाट अंधारात ' ( सीताराम शेटये ) अशा वेगवेगळ्या स्वरूपांत हा काळोख-प्रवास झालेला आहे. काळोख हे केवळ अज्ञान, वासना, विकृती या अर्थाने वापरले जाणारे प्रतीक न राहता जीवनातील सत्याचा आविष्कार या दृष्टीने त्याकडे पाहिले जात आहे.

अशी ही स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय मराठी कविता. केशवसुत व त्यांचे समकालीन, रविकिरण मंडळ, तांबे, मर्ढेकर या मराठी कवितेतील विविध टप्पे ओलांडून आता ती दिलीप चित्रे, खानोलकर, ग्रेस यांच्यानंतर डहाके गुरुनाथ, धुरी इत्यादी कवींच्या नव्या प्रवाहाबरोबर आता नवी वळणे घेत आहे. तिच्या काही मर्यादा अर्थातच आहेत. पण त्यावर ती मात करील असे सुप्त आश्वासनही तिच्यात आहे. अजूनही तिचा विकास पूर्ण झालेला नाही. नव्हे तो नुकताच कोठे सुरू झालेला आहे. म्हणूनच तिच्याबद्दल कोणतेही भाकित व्यक्तविण्याची घाई न करता तिचे मनः-पूर्वक स्वागत करून तिने आपल्याला हवी ती वळणे घ्यावीत एवढेच म्हणून ही प्रदीर्घ प्रस्तावना संपविणे योग्य ठरेल.

पणजी — प्रल्हाद वडेर

१ जानेवारी १९७७ — नरेन्द्र बोडके

## संदर्भ

१ काव्यकुंज / ( १९३० )
संपादक : शिवा फट्ट पै आंगले

२ गोमंतक परिचय / ( १९३० )
प्रो. बाळकृष्ण वामन सावर्डेकर

३ गेल्या पाव शतकातील गोमंतक / ( १९३८ )
सारस्वत ब्राह्मण समाज, रौप्य महोत्सव स्मरणिका

४ आजचा व कालचा गोमंतक / ( १९५४ )
दि गोवा हिंदू असोसिएशन रौप्य महोत्सव ग्रंथ

५ श्री शांतादुर्गा चतुःशताब्दी महोत्सव ग्रंथ / ( १९६६ )
( यामधील कै. पिसुर्लेकर व कै. प्रियोळकर यांचे लेख )

६ गोमंत शारदा-गोमंतकीय मराठी कविता–१५२६ ते १९६५ / ( १९७२ )
संपादक : रामदास प्रभू

७ सतराव्या शतकातील गोमंतकी बोली / ( १९६३ )
डॉ. वि. बा. प्रभुदेसाई

# अनुक्रमणिका


**दोन शब्द** तीन

**प्रस्तावना** चार ते पंधरा

**नीलिमा आंगले** १

ताईचं बाळ / एक होती चिऊ / पावसा पावसा

**हिरालाल माधव कामत** ४

आज वेगळे चांदणे / ही कोणती संजीवनी ? / राख माझी फासुनी

**दा. अ. कारे** ६

मेघ पटल शिरि गगनव्यापी / मुक्तिदिन

**श्रीकांत कासकर** ९

काळोखता / आक्रोश सोहळे

**अवधूत कुडतरकर** ११

तुझी आठवण काढून काढून / सरकणारी वळणं

**विष्णू राम कुर्डीकर** १३
नंदादीप / फणा सागराच्या / पिकल्या पहाटे

**मुरलीधर कुलकर्णी** १६
आठवण / चौकोनी चित्र / तालबद्ध

**निरुपमा केणी** १८
बहरल्या वाटा / सप्तरंग

**सौ. मधुरा कोरान्ने** २०
आभाळ रडलं तेव्हा

**नयन गुरव** २१
साऱ्या शपथा नाकारून / सूर्य नावाचा माणूस

**गजानन जोग** २३
आयुष्याच्या खोबऱ्याची गद्य कविता

**विठ्ठल श्रीकांत ठाकूर** २४
एखादा दिवस / मैफल / अनावरण

**सु. म. तडकोडकर** २६
सूर आणि सारांश / आठवण / कॅशियाची मैफल

**द. वा. तळवणेकर** ३१
उपरती

**शिवानंद तेंडुलकर** ३२
थुई थुई / नाटक

**शरच्चंद्र देशप्रभू** ३४
टॅटलस

**शरद नरेश** ३६
गाभारा / नदी / मृत्यू चौक / पाहुणा

**प्रकाश नाईक** ४१
कानांच्या वाटांनी / नमस्कार / समुद्रधून...

**शंकर परूळकर** ४३
पंख / खून

**दशरथ परब** ४५
शतचांदण्यांना

**बा. सा. पवार** ४६
तू सहज विसरशिल सारे / सूरच जुळला नाही

**परशुराम पाटील** ४८
मुडदे / कातार

**प्रकाश पाडगावकर** ५०
' तायट कॉलर 'च्या माणसांनो / कावळे

**रामदास प्रभू** ५३
कातरवेळ / प्रकाशाचे स्वप्न / किती पाहू वाट

**नरेंद्र बोडके** ५५
गाणे / सैगल / मोहेंजोदारो

**बा. भ. बोरकर** ५७
थंडाई / पाऊसश्रावणी / गुलबक्षी

**वि. ज. बोरकर** ५९
सांध्यप्रकाशांत / तुला जर मला फुलासारखेच / चिमण्या

**माधुरी मुंज** ६२
माझी वेदना

**सुदाम मोटे** ६३
दिवाळी काही : खुणा

**शंकर रामाणी** ६५
वारा इथे भरारा / अशा शिशिरवेळेला / दिवे लागले

**अमिता अ. रायकर** ६८
यशोदा

**वसंत शा. वैद्य** ७०
व्यथा / हे किती बरे !

**चित्रसेन शबाब** ७२
थिटयावरच्या सावलीला शोधीत

**तुकाराम रामा शेट** ७३
या आर्द्र डोळ्यांतून
**सीताराम ल. शेट्ये** ७४
आणि सावल्या संपलेल्या / आता माझे डोळे काजवे झालेत
**द्वारकानाथ शेंडे** ७६
जुइगंधाला नकळत ग / गणगोत म्हणो मज वेडा /
अपुल्यांतच अपुल्याला
**शशिकांत सरदेसाई** ७८
स्मृति / अशीच एक संध्याकाळ
**शहाजी बापू साखळकर** ८२
पाच अभंग
**सुनीता साखळकर** ८३
पक्षी
**विजय सातपुते** ८४
नथिंग मोअर / उत्खनन / हिवाळ्यांतील कविता
**अनिल सामंत** ८९
तीन पिसे / वारूळ / कळप
**परिचय** ९३

●

## नीलिमा आंगले

### ताईचं बाळ

ताईचं बाळ
दिसतं छान
त्याला पाहून
हरपतं भान

ताईच्या बाळाचे
निळे निळे डोळे
त्यांत उमलती
देवाची कमळे

ताईचं बाळ
हसतं गोड
वाटे ह्याची
काढावी खोड

ताईचं बाळ
दिसतं कसं
प्राजक्ताचं
फूलच जसं

## एक होती चिऊ

एक होती चिऊ
नि एक होता काऊ

काऊ म्हणाला : " चिऊ
आपण दोघं राहू
घालशील मला न्हाऊ ?
आणीन तुला खाऊ "

चिऊला नव्हता भाऊ
चिऊ म्हणाली : " काऊ
मला नाही आता
कुणाचाच बाऊ
आजपासून हो
तू माझा भाऊ "

एक होती चिऊ
नि एक होता काऊ.

## पावसा, पावसा

पावसा, पावसा
तू असा रे कसा ?
पडशील दिवसा
पावसा रे पावसा

पावसा पावसा
सांग ना रे मला
देवबाप्पा कुठनं
पाठवतो तुला ?

पावसा पावसा
राहतोस तू कुठं ?
असतील का तिथे
राक्षस भुतं ?

काय तुझा तोरा
पावसा रे पावसा
घे तुला पैसा
नको पडू दिवसा

# हिरालाल माधव कामत

## आज वेगळे चांदणे

आज माझिया मनात
कोण झंकारते वीणा ?
खोल अंकुरले सूर
गूढ घालती उखाणा ...

रोमरोमात जागले
गाढ निजलेले अर्थ
आज वेगळे चांदणे
वेगळ्याच आकाशात ...

## ही कोणती संजीवनी ?

राख माझ्या प्राक्तनाची
मीच भाळी लाविली
मीच माझ्या जीवनाची
अंत्ययात्रा पाहिली

बांधुनी दुःखास माझ्या
कोंडलेल्या भावना
एकट्याने चालले
माझे मढे तिरडीविना

पेटली माझी चिता
अन् उमलली ओव्यांतुनी
कोठला हा गारवा
ही कोणती संजीवनी ?

## राख माझी फासुनी

भेटतो सर्वांस मी
अन् भेटती सारे मला
स्पर्शाविणे पण गे तुझ्या
मज वाटते मी एकला

जाळिते हृदयास या
जी जन्मता दिधली सुरा
ठिणगून ती मज पेटवी
मज जाउ दे जळुनी पुरा

जाईन वेधित स्वर्ग मी
त्या पेटत्या ज्वालांतुनी
गाईल कुणि वेडा उद्यांचा
राख माझी फासुनी...

## मेघपटल शिरि गगनव्यापी

मेघपटल शिरि गगनव्यापी
कविचे आहे झापड घालुनि
मौनापोटी असेल अपुल्या
लपले वादळ, रुजवित शंका.

काळवंडुनी गेल्या अवघ्या
द्युतीत न्हाल्या हसऱ्या रेषा
मुक्त पोकळी झाली आता
अष्टदिशांच्या तटात कारा.

क्षीण विरळ जलधारा बरसति
पुसट तयांची झिरमिर भवती
स्तिमित शून्य अवकाशी अविरत
विखरी धूसर उदासीनता.

पंखामधले त्राण हरपुनि
झुलुका पडल्या असती निपचित
पालवीत फांद्यांत अडकुनी.

रायांमधल्या तळी तरूंच्या
कुठे रुपेरी नाही ओघळ
असे साचला केवळ कर्दम
वरती पिकली पाने, मोहर
फळे कोवळी मरगळलेली.
गळुनी एकच काला होई
कुंद कुबट निःश्वसिते त्याची
अंतराळि वर तरळत चढती.

छायातळिंचे हिरवे अंकुर
शिरि टपटपते थेंब झेलिते
झाले आतुर ऊब प्यावया
निळीतल्या किरणांच्या ओठी

## मुक्तिदिन

आज मला पूर्ण लाभे
आकाशाचा आशिर्वाद
छाया होती झाकळीत
तिचा लोपे छळवाद.

भूमिमाय अंकीं घेई
आज प्रीतीने अपूर्व
आज सुवर्ण मुकुट
शिरी माझ्या घाली पूर्व.

शीळ सांगे कानी माझ्या
तूच सम्राट तूच स्वामी
करी मस्तक उन्नत
त्वरे होई अग्रगामी.

आज प्रीतीसाद मिळे
विहंगाच्या लकेरीत
नृत्यगीतात लाटांच्या
स्वैर वायुलहरीत.

मनोनीडातून आज
अंतराळी झेपावती
संकल्पांचे विहंगम
नवी क्षितिजे धुंडिती.

## श्रीकांत कासकर

### काळोखता

ही सगळीच काळोखता...शरीर वेढून राहिलेली
झाडांची छायार्तता...काजव्यांची काळोखगाणी
डोळादेखत मालवते क्षितिज...वाट पायातून निखळलेली
अनंत वाटांची आवर्तने...शरीर ओवंडणारी
शेवटी भेटली नाहीसच...विसरलीस स्वतःच स्वतःला
विसरणे हेच खरे आयुष्याच्या सरणावर उभे असताना
तुटाऱ्यात आठवणी...काळोखखांब दुभंगून
मृत्यू प्राणात भेटावा...जसे पाखरू पानाला भिडावे

### आक्रोशसोहळे

अनंत वाटा ओलांडल्या अन् इथे आलो
व्यथासंपन्न काळोखाच्या प्रदेशात
इथे आलो अन् डोळ्यांना आक्रोश जडला
सदा उन्हे अन् पाचोळा पांघरलेल्या
इथल्या वाटा वाहून नेतात वेदनेच्या दिंड्या
दिशांची विषण्णता गाणाऱ्या चेहऱ्यांची
इथली माणसे निषेध करतात
तुमचा, तुमच्यातील तत्त्वज्ञानाचा.
त्यांना तुमची फिकीर नाही
तुमचा सूर्य मावळो न मावळो
ते स्वतःच माध्यान्हीची उन्हे होतात भर संध्याकाळी
त्यांचे गाणे पाऊस पडून गेल्यानंतरच्या पडझडीचे

त्यांचे गाणे काळोखाच्या नशेत
वितळणाऱ्या दिशांचे
त्यांचे गाणे अकल्पित
निखळणाऱ्या उल्कांचे
त्यांचे गाणे काळोखाच्या किनाऱ्याला
लागलेल्या झाडांचे
आयुष्यवाटेवर उमटणाऱ्या आक्रोशपावलांचे

# अवधूत कुडतरकर

## तुझी आठवण काढून काढून

तुझी आठवण काढून काढून फुलं सुकली...कळलंच नाही
तारे मोजता मोजता रात्र निघून गेली...कळलंच नाही
दिशा-दिशांत ध्वांत दाटून एक एक तारा आला
प्राणामधल्या पूजेसाठी हलकेच एक दिवा लागला
तुझं माझं खोल नातं आभाळालाही पटलं नाही
किती रात्री गेल्या सुन्या तुझ्याविना शून्य सगळं
आता फक्त जपते चांदणं आपल्या एका मिठीमधलं
किती वाटा चालून जावं पावलांनाही कळत नाही
कधी कधी होतातही जखमा अशा कायमच्याच
कधी कधी बोलक्या पापण्या होतात अशा मुक्याशाच
अशी ओली दुःखं भोवती, वादळ ओसरलेलं नाही...

## सरकणारी वळणं

कधी कधी आयुष्याच्या वाटा
अचानक वेगळ्या होतात.
ज्यांना उःशापाचे असते
गूढ वरदान...
सडलेल्या पावलांनाही कळत नाही
बेगुमान सरकणारी वळणे
आताशा या वळणावर
गर्द झाडीची किनार हिरवे स्वप्न घेऊन

पसरत आहे.
त्या उसळत्या लाव्हाच्या प्रदेशात
भुईचाफ्यांचा गंध दरवळतोय
अशा वळणावर फार जपावं लागतं
कारण अचानक ती उलटी होतात...

## विष्णु राम कुर्डीकर

### नंदादीप

देवा तुझ्या दारी
तुझीच पाऊले
पाहुनिया मी रे
मला विसरले

रोमरोमातही
भावनेचा वारा
वाहे अंतरंगी
भक्तिरसधारा

अखंड चिंतनी
मीरा नामधारी
आळवीत होती
वीणा एकतारी...

तूच कृपावंत
सखा गिरिधारी
अवघा भरोनी
गेह निराकारी

पाणावल्या डोळा
सावळे स्वरूप
अनंत गाभारी
एक नंदादीप...

## फणा सागराच्या

वाढलेल्या अंगी
कळा पुनवेच्या
स्वच्छंद लहरी
फणा सागराच्या...

नाचे नागमोडी
फेसाळल्या ओठी
आधी नम्रतेने
सरितेच्या काठी...

अडखळे ध्वनी
सोसाटल्या वाटे
श्वासही जहरी
बोचतात काटे...

सुप्त भावनात
उफाळूनी उले
सावल्यात गोरी
चांदण्याची फुले...

# पिकल्या पहाटे

पिकल्या पहाटे
रेंगाळते निशा
नंदुल्या पाऊली
निशेतून उषा ...

तुडुंब नयनी
धुक्याची धवले
आभाळल्या वाटे
तरंगती उले ...

चांदण्या हवेत
चंवरली बने
रांगता सावल्या
नव्हाळली उन्हे ...

पिकल्या पहाटे
रेंगाळते निशा

## मुरलीधर कुळकर्णी

### आठवण

पहाटतंद्रीतून झाडं उजाडताना धूसर
शुक्रावलंबित सावल्या नितळत जात असताना
क्षितिजावरून संप्रबद्ध प्रकाश काळोखाच्या पाशांत
असतो स्तब्ध. झाडांचा गर्दपणा तळ्यावर विखुरलेला
आकाशाची प्रतिबिंबं हिंदकाळीत अदृष्ट अन्
कोकिळरव पसरतो पाण्याच्या संथपणावरून पलीकडे
बंधाऱ्यापर्यंत. तेव्हा तू असतेस अबोल उभी
चांदणी शुक्रप्रकाशात न्हालेली. मंद, शीतळ
ओघळणाऱ्या विपुल केशसंभारातून मला येते
आठवण अचानक माझ्या गाण्यांची
जी तू प्रथम गायिली होतीस निर्धास्त अशाच स्थितीत.

### तालबद्ध

तिच्या पियानोचे प्रमाणित असतात सूर
तिच्याच प्राकारात जेव्हा संध्याकाळ
मावळून उरलेला असतो रक्तिमा तिच्या
केशकलापांवर जे तिच्या नितंबांवरून ओघळून
जमिनीला स्पर्शलेले असतात अनिर्बंध
तालबद्ध तिची बोटे फिरतात पियानोवरून
तेव्हा स्तनांवर किंचित् लहरी लहरून
संपतात ज्या वेळी तिचा पदर घसरलेला असतो.

तिच्या डोळ्यांची समाधि अभंग असताना
बागेतला पारिजात हळूच डोकावतो खिडकीतून
जेव्हा त्याची केशरी दांड्यांची गळतात फुले
जमिनीवर तिच्या केशभारासारखीच...
त्याच्या नकळत लयीत.

## चौकोनी चित्र

अंधारछायांनी आकाश झाकळताना
उरतात रेषा फक्त घराझाडांच्या
माझ्या खिडकीच्या डोळ्यांतला तुटलेला
अंधार कवटाळतो अस्तित्व दिव्यांचं
स्वल्प दूरातलं आणि वर्तुळं
माझ्या डोळ्यांतल्या भुकेकंगाल स्वप्नांसारखी
स्पष्टतात दिव्याभोवती
ज्यांचं स्वत्वच असतं परावलंबित
—माझ्या आयुष्यच्याश दिवसांचे
कोसळलेले कडे विकीर्ण—
: मी आणि अंधार :
माझ्या खिडकीच्या गजांनी फाटणारं
काळोखी आकाश आणि निष्प्राण निर्वचन
झाडांच्या आयुष्यातून पुढं सरणारी रात्र
किती रात्रकाळोख मी पाहिले फाटलेले
माझ्या खिडकीच्या डोळ्यांत आकाशासहित !
किती कोसळले कडे काळोखाचे माझ्या
खिडकीतल्या चौकोनी चित्रावर
प्रकाशित झाडांच्या लोभस सायंकालीनं रंगविलेल्या !

निरूपमा केणी

## बहरल्या वाटा

बहरल्या वाटा
मन केवड्याचं बन
डोळियांच्या डोही
डोलते चंद्रकोर

दूर वाजे पावा
त्याचे निनादती सूर
गाभाऱ्यात साठे
कोवळा ओलावा

रुणझुणती पावल
सांडला गहिवर
ओथंबल्या अंतरात
डोळे भावनांचं झुंबर

## सप्तरंग

सोनसळी कातरवेळ
डुंबली जळात
अधोमुखी झाली
माझी मोरपंखी रात

सावळ्या रात्रीत
बावरला तरंग
झोंबणारा वारा
लाजले सप्तरंग

## सौ. माधुरी कोरान्ने

### आभाळ रडलं तेव्हा

आभाळ रडलं तेव्हा
ओघळणाऱ्या पागोळ्यांनी
मीच माझी
गहिवरून
मुक्त रडले होते ...

मेंदीघोसांतून
हळुवार सादास
हृदयापाशी खोल
न साठवण्यासाठी
डोळे मिटले होते ...

आणिक जेव्हा
ठिबकणाऱ्या पागोळ्यांची
गालावर ओघळणाऱ्या
हासली लाजरी फुलं
समोरच्या गुलमोहरावरती
तेव्हा
धुंदावून जाऊन
हास्यात न्हाले होते मंद
मीच माझी
उलगडल्याच्या धुंदीत ...

## नयना गुरव

मराठी ग्रंथ संग्रहालय
22915
दा. क्र. 
का०४ 233


### साऱ्या शपथा नाकारून

साऱ्या शपथा नाकारून
एक तीव्र बंड रक्तातून रुजून येतेय्
कोसळत्या लाटांची स्पंदने
रक्तातून अनिवार होत चाललीत
माझ्या मलाच माहित नाही
हे सारे कशासाठी चाललेय
कशाला ही डोळयांची शिडे
दूरवरून येणाऱ्या सादाला
ओळख दाखवून फडफडताहेत
साऱ्याचा विसर पडतो या क्षणी
मी माझ्यातच बुडत चाललेय्
साऱ्या शपथा नाकारून एक तीव्र बंड
रक्तातून रुजून येतेय्

### सूर्य नावाचा माणूस

एक माणूस माझ्या स्वप्नात आला,
अवचित मध्यरात्री.
त्याच्या डोळयांना स्वप्नांचे व्रण होते,
त्याचे हात,
कोपरापासून कलम करण्यात आले होते.
आणि पावलांना,
पोलादाची चाकं चिकटवलेली—

एक माणूस माझ्या स्वप्नात आला,
दिशाहीन काळोखाचं गाणं गात.
त्याला, झुलणाऱ्या आकाशाचा आशीर्वाद हवा होता.
तो म्हणाला–मी, एका अज्ञात देशाचा रहिवासी आहे
माझ्या स्वप्नांना कधी न संपणाऱ्या
चकऱ्याचा शाप आहे.
मी तुझ्यातूनच नव्हे, तर इथल्या साऱ्या माणसांच्या
हृदयात उमलत होतो.
कधी काळी...
आता इतकेच कर
माझ्या चकऱ्याचा शाप आपण वाटून घेऊ.
स्वप्नांच्या पंखांनी अज्ञातात
झुगारून देऊ.
एक माणूस माझ्या स्वप्नात आला
अवचित मध्यरात्री;
आणि म्हणाला—
तुला स्वयंप्रकाशी होता येईल.
खरंच...मी सूर्य आहे.

### गजानन जोग

## आयुष्याच्या खोबऱ्याची गद्य कविता

तिच्यासाठी थांबलो ‘ कल्पान्तापर्यंत थांबेन ’ म्हणत
टक्कल पडायचं थांबलं नाही, जरी आहे तेल थापत !
ती आली, नाही असं नाही, पण फार उशिरा
आयुष्याचं खोबरं ! डोकं खोबरवाटी ! इतक्या उशिरा !
ती आली तशी गेली, जाताना म्हणाली :
“ टक्कल चालले असते, इस्टेटीचं का खोबरं केलंस ?
तात्पर्य : तिला माझं फक्त मंगळसूत्र हवं होतं.
बाजारी भेळ खाण्यासाठी आडोशाला घर हवं होतं !
तिच्यासाठी थांबलो, काळ कुठे थांबला होता ?
तेलाचे भाव थांबले नव्हते.
आता मात्र भाव शून्यावर आलाय.
बघा ! एक तरी केस या मस्तकावर आहे ?
या टकलासारखं जर मनही गुळगुळित असतं
फार बरं झालं असतं, तुकतुकीत हसता आलं असतं
झापडे ओढली डोळ्यांवर की आत पाणी आलं नसतं.

# विठ्ठल श्रीकांत ठाकूर

## एखादा दिवस

एखादा दिवस हसत येतो, हसवत येतो.
पण त्याची बनते वेगवान पावसाची सर !
त्या दिवशी दुःखं सिक् लीव्ह घेतात
पण एखादा दिवस दुःखांचा पण दिवस असतो
मग तो दिवस अश्रूंनी भिजतो, अगदी चिंब !
अंग झटकत संथ चालणारं कुत्रं बनतं त्या दिवसाचं.
आणि एक दिवस 'तो' दिवस येतो !
मग हलकेच तुम्ही ...
मागं असतात "ईश्वर मृतात्म्यास" असले किर्कोळ
शब्द ! मग मात्र दिवस तुमचं तोंड चुकवतात.
रात्रीचंच साम्राज्य असतं मागाहून !

## मैफल

आमच्या सतारीचे सूर जुळवता जुळवता
रात्र कधीच सरली
आणि मैफल झालीच नाही,
कारण सूर जुळलेच नाहीत !

# अनावरण

तुझ्या स्मृतिच्या छिन्नीनं,
मला पुतळा उभारायचाय,
आमच्या विरहाचा !
पण त्या पुतळ्याचं अनावरण तरी
तुझ्या हातांनी करशील काय ?

## सु. म. तडकोडकर

# सूर आणि सारांश

दुरावलेले सूर आता सुरावले आहेत
दुखावलेले पूर आता सुखावले आहेत
वक्त तेव्हाचा आता पुनः कधी आठवू नये
देण्याचे बहाणे करावेत, घेण्याचे करू नयेत.

हृदयांचे जुळणे व्हावे, शब्द कधी मागू नयेत
रित्या मनांचे ओघळ अशा वेळी वहावू नयेत
कोण कोणाचा, प्रवासीच तो दाही दिशांचा
वळणावरचे साथी पुनः कधी दुरावू नयेत
देण्याचे बहाणे करावेत, घेण्याचे करू नयेत

शब्दांचा तसा पक्षी होतो कधी पारवा
गाण्यातून त्याच्या माझ्यावरून वहातो असा गारवा
ऐलथडी तर ज्यांची त्यांची राज्ये आहेत
देण्याचे बहाणे करावेत, घेण्याचे करू नयेत.

रक्त–चंदनी साथीचे मागणे होते तसे मिळावे.
गंध–युक्त गाभारे पुनः पुनः बांधले जावे
धारेदार संगिनीनी ते तसे उद्‌ध्वस्त होऊ नयेत.
देण्याचे बहाणे करावेत, घेण्याचे करू नयेत.

सारांश—
दुरावलेले सूर आता सुरावलेले आहेत
दुखावलेले पूर आता सुखावले आहेत
वक्त तेव्हाचा आता पुनः कधी आठवू नये.
देण्याचे बहाणे करावेत, घेण्याचे करू नयेत.

## आठवण

मला ज्यावेळी मरण येईल
लाटा वादळात वा आकाशात
तेव्हा एकदाच सांजवात लावा,
स्मृतीसाठी नव्हे वा रूढीसाठी
पण नदीच्या प्रवाहात अडकणाऱ्यांना
मी सावरू शकलो नाही, त्याची
एक जळती आठवण म्हणून !

## कॅशियाची मैफल

समोरचा कॅशिया थरथरून उठला
आणि दंवाळ शिवर शिरशिरत गेला
आमच्या शरीरावरून.
तू गाणं लिहायला घेतलंस
कुहू ऽ कुहू—
तेव्हा शब्द न् शब्द फुलून उठले
मोन्या नर्तिकेसारखे !
फुलांचा मोर नाचू लागला होता खरा
संतूरच्या थरकत्या तारांवरून,
हातांची दहा बोटं गुंतवून
दोन सर्प-सर्पिणीच्या उन्मादक श्वासात !
तू गाणं लिहीत राहिलीस्
कुहू ऽ कुहू—
त्या गुलमोहरी शब्दांना
आपला रंग हरवल्यासारखं वाटलं :

ते म्हणाले, आमचा रंग हरवलाय.
ते म्हणाले, आमची धुंदाळ नजर हरवलीय
ते म्हणाले, जग नीरस बनलंय.
तो रंग, तो सुगंध
ती धुंदाळ दरवळ आमच्यापाशी होती.
पापण्यांच्या हळव्या फुलांनी
चोरून ठेवला होता तो खजिना
प्रीतीच्या ऐश्वर्यी शिंपलेदार महालात !
तू गाणं लिहीत होतीस
कुहू ऽ कुहू —
मी हलका हलका होत गेलो.
सागराशी नातं जोडून परतलो.
तू नदीचं शरीर ल्याली होतीस.
मनाच्या कडा पारपार रुंदावल्या.
जड धुंदीत मी निखळ हरवलो.
—आणि फुलांना सांगितलं—
तुमच्याकडून चोरलेल्या खजिन्याच्या दिमाखात
माझ्या राणीचं स्वागत करीन.
कॅशिया हसत राहिला. गोड, गुलाबी.
निळं निळं आकाश गडद झालं. शबनमी.
तू त्याचेळीही गाणं लिहीत होतीस
कुहू ऽ कुहू—
त्या गाण्यानं सुगंधाचं अंग सुटं सुटं होत गेलं.
त्या दरवळाचं एक घर बनवलं
व्रणांच्या मखमाली गालिच्यावर
एक एक कोनाडा साथीदार बनला
प्रणयाच्या एक एक ऋतुचा !
एक एक क्षण विरघळून गेला.
यावेळी तुझं गाणं गायलं जात होतं
कुहू ऽ कुहू—

मोगरीच्या पाकळयांत हळुवार लपलेलं ते तुझं गाणं
आता सुटं सुटं झालं होतं.
शब्दांना किनखापी झालरी लटकल्या.
फुलांचं रूप पुनः उधळलं, उधळत गेलं.
दौडत गेलं सोनाळ हरणांचं
स्पंदन आणायला.
साजिरा शिशिर लाजून लाजून चूर झाला.
तेव्हा हिरवळ वाढली होती.
ऋतु बदलत होता.
निःशब्द स्पंदनांचे कित्येक झंकार
रुणझुणत उठले.
तेव्हाही ऋतु बदलत होता.
संगीताची मैफल थांबू इच्छित नव्हती.
तुझं गाणं गायलं जात होतं
कुहू ऽ कुहू—
हृदयांची ओवाळणी करण्यात
क्षणाक्षणांचे हात थकले.
मनाच्या कडा तरीही रुंदावत राहिल्या.
पाण्यातले किनारे धडाधड कोसळत गेले त्या महापुरात.
मैफल गडद गडद रंगतच राहिली. युगायुगांसाठी.
धारदार वर्षाव होतच होता. बिलोरी.
श्वासांचे महाल बांधले जात होते, किनखापी
पहिला पाऊस पडल्यानंतर मातीनं सोडलेल्या तृप्त श्वासांचे.
सगळंच आपोआप बांधलं गेलं.
शपथा नाकारून. अनावश्यक म्हणून.
पैलतीराची ओढ विसरून.
नंतरच्या क्षणांची रंगत वाढवत.
अर्थ वाढवणाऱ्या सुख्या शब्दांच्या
संगतीनं, लब्हाळ मस्तीनं
कॅशियाचा रंग उचलणारं तुझं ते गाणं

आता कोकिळेनं उचललं होतं...
माझी कोकिळा त्या घरात होती.
घनदाट प्रीतीत न्हात होती.
केस मोकळे सोडून.
हृदय ओथंबून. संथपणे.
शिरशिरत.
थरथरत.
गुणगुणत.
कुहू ऽ कुहू—

आता कोकिळेनं उचललं होतं...
माझी कोकिळा त्या घरात होती.
घनदाट प्रीतीत न्हात होती.
केस मोकळे सोडून.
हृदय ओथंबून. संथपणे.
शिरशिरत.
थरथरत.
गुणगुणत.
कुहू ऽ कूहू—

द. वा. तळवणेकर

## उपरती

आमचे डोहाळेच दरिद्री !
एक घेतो आकाश
नि झुलता चंद्र
आणि आयुष्य रेटत रहातो
उशिरानं कळतं,—
आयुष्याचा कोवळा गर्भ घेऊन
गरोदरपण धरण्यापेक्षा
उबग आलेलं उदर फाडून
तो फेकावा रस्त्यावर !
आणि चिखल तुडवीत
नाचावं एकदा थयथय !!
चंद्रालाही ग्रहण लागतं
तेव्हा आकाशभर सावली होते,
त्याला डोकीवर धरला, तिथेच घसरलं.
नि आयुष्य कुरतडून घेतलं.
नाहीतर,—
नाहीतर, सपाट आयुष्यानं
विजय भोगला असता. नक्की !

## शिवानंद तेंडुलकर

### थुई थुई

तिचे ओठ वितळले
अन्
मोरांची पिसं वाऱ्यावर बेभान उडून
पिसांची दाट झाडे झाली
तेव्हापासून
मोरपिसांच्या रानात सैरभैर फिरणारे
मोर : थुई...थुई...
थुई...थुई...
विवस्त्र चांदण्याचं तुफान
अन्
आभाळातील ढग
रंध्ररंध्रात चकचकीत वितळणारे
तिच्या पिठ्ठ शरीरावर कोरलेली चमचमनक्षत्रं
रातराणीचा धुंद गंध पिळणारे
पौर्णिमेचे दोन फुंद चंद्र
अन्
पाठीवर रुळणाऱ्या काळयाकुरळया
बेभान केसांची मैफल.

### नाटक

थापा मारताना जो आम्ही अफलातून अभिनय केला
त्यावरून आम्ही एक बेस्ट ॲक्टर आहोत हे तुम्हाला

मानावंच लागेल...आणि हेही मानावं लागेल
की तुम्ही देखील एक बेस्ट ॲक्टर आहात. अर्थात
तुमच्या संदर्भात नाटकाला चार भिंती असतात
हे वगळून. तर लाईफमधील सुखदुःखाचा
गोवर्धन पर्वत आम्ही खुशाल करंगळीच्या बोटावर
धरून आध्यात्मिक वगैरे भंकस गोष्टींवर चळाचळा
मुततो हेही तेवढंच खरं आहे. हॅम्लेटचे जीवन
उद्ध्वस्त करण्यास कारणीभूत स्वतः त्याचा बापच
होता. तसा आमचा हॅम्लेटच्या बापावर सूडबीड
उगवण्याचा विचार नाही. आम्ही मस्त जॉली आहोत.
सध्या आमच्या घशात मासा अडकला आहे—
पण आम्हाला त्याची फिकीर नाही. आम्ही समुद्र होऊ
त्या माशाला लाईफला लावू. अरे पण आम्हाला
पोहायला येत नाही. आमचं डोकं दुखतंय—
अफलातून. खरंच आता आम्ही अभिनय करीत नाही.
ह्या डॉक्टरनं दिलेल्या चष्म्याला धमन्यांचे धुमारे
फुटलेत...आत्ता काळोख. काळोखात मांजर...
मांजरात काळोख. काळोखात मी. माझ्यात काळोख...
त्याचं असं आहे—काळोखात मांजराच्या हिरव्या
डोळ्यांना हिरे समजून मी मांजराचा खून केला आहे.

## शरच्चंद्र देशप्रभू

### टँटलस

त्या भयाण काळोख्या विहिरीच्या खबदाडीत
त्याचा जन्म झाला
तिथेच तो विष्ठा करतोय
त्याच वासानं कोंदटलेल्या वातावरणात
जेवून ढेकर देतोय
त्याच ढोलीत शृंगार करतो
आपल्या वखवखलेल्या इंद्रियांची
भूक भागविण्यासाठी
किमान एवढ्याची तरी त्याला जरुरी असतेच
विहिरीच्या काळ्याभोर पाण्यात
विश्वाचे प्रतिबिंब पाहत आवंढे घोटतो
कधी त्याला फुलाफळांचा मधुर वास येतो
उकळत्या पाण्याच्या वाफेसारखी
त्याची वखवख उफाळून येते
शेवटी त्याला आपलंच नाक शिवावं लागतं
तोंडानं श्वासोच्छ्वास करून
जिकीरीचं जीवन जगण्यासाठी
कधी पावसाळयात पाणी वर येतं
तो पाण्यावर तरंगतो
आता विश्व फक्त एकाच हातावर
तो उडी मारणार

इतक्यात—
ओढतात पाय त्याचे सगेसोयरे
नेतात त्याला
त्या काळोख्या विहिरीच्या खबदाडीत
बजावून सांगतात, ' तू बेडूक आहेस
बैलाएवढं तुझं पोट कसं फुगेल ? '
सोनेरी किनार पकडून
तो ओरडतो, ' मी टँटलस ! मी टँटलस !

## शरद नरेश

### गाभारा

गाभारा : स्वकल्पनातीत
नाजूक दाटलेला । अत्यंत
शुचिर्भूत किनारे । किनारताना
उंचावतात
तरतरीत स्वरांत ।
। वेगवेगळ्या मनांत
पसरतात निळ्या पंखांनी । पारदर्शक
आभाळताना
आठवतात समोरच । विसरल्यासारखे
वळतात हसतमुख
केवड्याच्या शब्दांत । एकरूप
रूप । नितांत गाभाऱ्यात
। दरवळताना ।
अंकुरलेलं । स्पर्शरूप गांभीर्य
अंतरंगात

## नदी

दररोज अशीच एक आठवण घेऊन
नेहमीचीच ही संध्याकाळ संपवून
परतणारा मी
खिळून राहिलेल्या या तळयाचा प्रत्येक थेंब
खळाळून उठेल म्हणून वाट पहातोय
खुळयासारखा, सभोवार, एकाकीपणे.

माझी आजी वेडी होती
दररोज संध्याकाळी ती या तळयावर येई
पण ही नदीच आहे
असा तिचा विश्वास होता
कारण, तिनं इथं जहाजं पाहिलीं होतीं
शेवटी जहाजांचंच वेड धरून मेली
हे अश्रू, तिनंच मोजलेले
आपुलकीनं जपलेले,
कधीकाळी उपयोगी पडतील म्हणून दिलेले
मी बाळगून आहे.

मी एकटाच आहे
ही नदी एकटीच असावी
माझ्या आईबापांचा जीव घेतलेली
हिचं कोणाशीच नातं नाही
तरीपण ती माझीच आहे
मी हिच्या काठावर बसतो.
खूप वेळ. निवांत.

मला काळजीविना कायम जिवंत
जगावंसं वाटतं.

या फेसाळलेल्या ओशट अश्रूंत
स्वतःचं प्रतिबिंब बदलणारं हे शहर
सोडून मी चाललोय्
माझ्या खुळेपणावर माझा विश्वास आहे.
मी स्वप्नात पाहिलंय
काही जहाजं, डुंबत असतात
सूर्यासारखी, स्वतःच्याच प्रतिबिंबात
हेलावत विस्कटणारी, आपलीच रूपं
झाकाळून, संध्याकाळ हताश होत जाते
सकाळपर्यंत.

एकदा रात्री मी इथं आलो होतो.
तेव्हा एक स्त्री स्नान करीत होती
त्या भयाण अंधारात मी
थरथरत, दरदरत
एक चाहूल गिळत होतो
तेव्हा तिनं एक किळसवाणं
हास्य केलं. वातावरणाला
अनेक भेदक तडे जाताना, संथ गतीनं
ते विकृत हास्य ध्वनिशून्य होत गेलं
तसा मी सावकाश विरत
जमिनीवर पसरत सपाट झालो.
तेच ऐकायला मी नेहमी येतो
पण आता त्याचीही नशा चढत नाही.

मी वेडगळ आहे, एकटाच
या खड्ड्यात
वाट पहातोय—दुसरा कोणी पडेल म्हणून
पण इथं, प्रत्येकाला वेगळा खड्डा आहे
मरण्यासाठी, स्वतंत्रपणे कुढत.
हा खड्डा—
आर्त उंचीचा, गच्च काळोखाचा
म्हणजेच मी, तरीपण विचार करतोय—
नदीचा ओढा
कायम जगवणारा...
मला आता निघालं पाहिजे

ही नदी स्थिर वहात आहे.
"गर्दीच्या बुडबुड्यात तगून रहावी
अशी प्रसिद्धी जागवणं"
हीच हिची नीती आहे.
यासंबंधी मी कधीच काही बोलत नाही
या नदीचा प्रत्येक थेंब, हे एक
अळणी आयुष्य आहे.

मी दर पौर्णिमेला इथं येतो
नदीत सपाट आकाश पहातो
दोन चंद्रांतलं सारखंच अंतर पाहून
एका अदृश्य इच्छेत माझा जीव
पिळवटून निघतो. त्या भयाण
चांदण्यात माझ्या हातात असतो
माझ्याच सावलीचा गळा
तेव्हाच मी माझं आयुष्य
यात मिसळून टाकतो.

आता माझ्या आयुष्याच्या रेषा
या नदीच्या दोन्ही तीरांवर
कायम हेलकावत आहेत.

## मृत्यु-चौक

घुसळलेल्या त्रिकाळ काळोखासमोर
चंद्रानं डोळे मिटलेले असावेत
न कळलेल्या एका बेलाशक दिशेला
कभिन्न काळोखात ठामपणे जाणारा
ध्रुवपक्षी,
सोसाट्याच्या बुरुजावर एका हताश रात्री
अनोळखी स्वर्गाशी अटळ तडजोड
स्वीकारल्यानतर
स्वतःला स्मरून जिवंतपणाची शपथ घेताना
मृत्यु-चौकात चमकून जाते
एक अंधुक चांदणी

## प्रकाश नाईक

### कानांच्या वाटांनी

कानांच्या वाटांनी
कधीच केलंय
सचैल स्नान
लाचारीचे शब्द
त्या वाटांवरचे
प्रवासी होते म्हणून.
आता येऊ देत
आव्हानप्राणित शब्द
आणि अक्षर अलौकिक आव्हानं
ज्यांच्या तेजानं
उजळून निघावीत
सारी जीवनं
आणि मरणं

### नमस्कार

समोर उभा असतो
थोर माणूस, खरा माणूस
माझ्या आयुष्याला
दिलाय ज्यानं आकार
असा
मनाच्या कोपऱ्यातून

आदरसूर्य
तेजाळू पाहतो
देहाच्या गगनात
माझे दोन्ही जुळलेले
सरळ आकाशगामी हात
आणि जुळलेले पाय
या सर्वांनिशी
मीच झालेला असतो
मोठा नमस्कार !

## समुद्रधून

समुद्रधून...संन्यस्त क्षितिज
नित्य नव्यानं वेधक
सताड शून्याची पताका
सायंतेजात विरल्या फेसांच्या आहुती
जळजळत जाणारा माशांचा थवा
मिटल्या पापण्यांनाही इथं दिसू लागलंय
आणि एका निर्वासित सूर्याचं स्वप्न
तरारून थरारून
उपवर झालंय...

# शंकर परुळकर

## पंख

निळया आभाळातून पंख फडफडावित
तो क्षितिजापल्याड दिसेनासा झाला
तो गेला, परत न येण्यासाठी
पण तू का दुःख करतेस त्याबद्दल
ज्या पंखांनी त्याला तुझ्यापासून दूर नेलं
ते तूच नव्हते का दिलेस त्याला ?

## खून

अफाट मोकळया मैदानात तो उभा होता
दृष्टी दूर क्षितिजाकडे लागली होती
अचानक कुठूनतरी एक दगड अंगावर आला
त्यानं त्या दिशेला वळून पाहिलं
तोच विरुद्ध दिशेनं त्याच्या अंगावर दुसरा दगड बसला
आईगऽ ! तो कळवळला...
आणि त्यानं मागं वळून पाहिलं
एकाएकी चोहोबाजूंनी दगडांचा भडिमार सुरू झाला
घाबरून त्यानं सगळीकडे पाहिलं
आणि तो चमकलाच
डोळयांवर विश्वास बसेना
दगड फेकणारी सारी माणसं त्याचीच होती
आईबाप, भाऊबहीण, आप्तेष्ट, सगेसोयरे
इतकंच काय त्याचे जीवश्चकंठश्च मित्रसुद्धा

चोहोबाजूंनी तो घेरला गेला होता
पळता येईना, दगडांनी सर्व अंग ठेचून निघालं
मार न साहवून त्यानं धरणीवर अंग टाकलं
आणि आक्रोशला, पाणी ! पाणी !
कुणाला ऐकू गेले नाहीत त्याचे शब्द
दगडांचा मारा चालूच होता
शेवटी त्यानं जवळ साचलेल्या राशीतून एक मोठा दगड उचलला
आणि हाणला स्वतःच्या कपाळात
तो मेला
सर्वांचं समाधान झालं.
त्यांनी हात आवरते घेतले.

## रातचांदण्यांना

या वाटा चटावल्या आहेत
रातचांदण्यांना
रानझडीच्या पानापानांत
उभ्या आयुष्याला आळवणारे गंधर्व
समाधिस्थ होऊन इथं गात आहेत
रातचांदण्यांना

आभाळाची सारी पिसं
तुटून पडायला लागल्यावर
या रानावनाला एक ऊर्मी चढते
सुसाट वाऱ्यागत सळसळते पान पान
आणि उभा देह मात्र माखते
एक शून्य अंधार

या साऱ्या खुणा अजुनही
का आठवाव्यात ?
तुझं माझं मुळी नातंच नव्हतं
हे सांगायलाच फक्त
एक रात्र जागतो
रातचांदण्यांना.

बा. सा. पवार

## तू सहज विसरशिल सारे

तू सहज बोललिस सहज विसरशिल सारे
पण उरात माझ्या जळती अजुन निखारे

लाडात बिलगुनी तशीच पुन्हा रुसशील
तव शब्दपिसारा फुलवित तू हसशील
पण भाव कधी कळणारच नाही
गीत कधी जुळणारच नाही
हे असेच राहिल शल्य उरी जळणारे
तू सहज बोललिस सहज विसरशिल सारे

जुळतील कदाचित पुन्हा एकदा तारा
पुनरपी वर्षतिल तशाच अमृतधारा
पण सूर तसा निघणारच नाही
प्रीत तशी फुलणारच नाही
उभविणे असंभव आता स्वप्नमनोरे
तू सहज बोललिस सहज विसरशिल सारे

तू तशीच येशिल मिठीत माझ्या पुन्हा
तो तसाच येइल अजुनी गंध फुलांना
पण दोन मनांच्या वाटा दोन दिशांना
पडलेल्या उल्का पुन्हा न होतिल तारे
तू सहज बोललिस सहज विसरशिल सारे

## सूरच जुळला नाही

माथ्यावरचा रवि रखरखता कधीच ढळला नाही
कसे फुलावे गीत आपुले सूरच जुळला नाही—

स्वप्नांनी सजवावी गाथा लाख ठरवले होते
तृप्तीचे वरदानच नव्हते सर्व हरवले होते
पीळ राहिला तसाच आणिक सुंभहि जळला नाही—

वैफल्याच्या भोवऱ्यात हा जीव नित्य गरगरला
ऋतुचक्राच्या वावटळीतुन केवळ ग्रीष्मच उरला
भाळी सारे क्षण वांझोटे एकहि फळला नाही—

विसर पडावा जिथे जगाचा एकरूप होताना
दोन मनांची धाव राहिली नित्यच दोन दिशांना
समर्पणाचा अर्थहि तुजला कधीच कळला नाही—

परशुराम पाटील

## मुडदे

महात्म्याला ओलांडून जाताना
आठवते एक पुरातन शुभ्र व्यक्ति
भोवती तिच्या असंख्य लगडल्या दंतकथा
इजिप्तची ' ममी '
ताज, थडगी धरतात फेर.
एकेकावर मांडलेले गणित थोर.
मृत्यूच्या स्मारकात सामर्थ्य हे, ही घोषणा
अन् जित्या जिवात नुरावी धग
शब्दात यावी वल्गना.
यांपाशी असावे घर आपले
स्मशानाच्या राखणीत,
पोसावेत जिवंत मुडदे.

## कांतार

लुवाँगच्या दिसांत
मळणीनं मळून गेलेलं असतं अंग
काळ्याशार हातांनी
माड रसाचे घेत घुटक्यावर घुटके
तो विसरत असतो नियतीचे फसवे चटके
कंठाशी आलेल्या रसावर तरळतात इच्छा
मासळी पाण्यावर चमकाव्यात तशा.

जग भान विसरून उरतं देहभान
ओठांतून फुटते वखवखलेली एकेक तान.
त्या तानेत ती असते हवीहवीशी
तिच्या हातचा फुलोरा निमग्न करतो
सुगीच्या साईत हा
कांतार गुंफून स्वप्न पितो –
भाताच्या अर्कासारखं पिवळं जर्द.

## प्रकाश पाडगावकर

### ‘ तायट कॉलरच्या ’ माणसांनो

शब्दांचे निखारे सोडून आग कशाला लागत नसते :
आपण पुरते पेट घेऊन नंतर निखारे सोडायचे असतात
भावनांच्या पोळ्या वाढून पोट कुणाचे भरत नसते :
फळलेल्या झाडाची उदारता असावी लागते नसानसांत

‘ कोल्हेकुई ’नं भूल घालून टाळ्या घेणं कठीण नसतं
नंतर सिंहगर्जना करून त्यांना ‘ चूप ’ बसवताही येतं
खताशिवाय हरितक्रांतीच्या बाता, म्हणजे नुसता श्रम
हवेवरती घर बांधणारा निश्चित समजावा चक्रम

प्रकाशाचे स्तोत्र गाऊन अंधारच उबविणारे जास्त
‘ तायट कॉलरच्या माणसांनो ’ दिवे असे लागत नसतात !

### कावळे

एकापेक्षा एक येथे बुद्धिवंत कावळे
कुणाचं सत्य कुणाचं सखोल हे ठरविणं महाकठीण.
दिवस जेव्हा परडी भरून फुले उधळतो
तेव्हा या कावळ्यांचा बाजार येथे सुरू होतो.

## प्रकाश पाडगावकर

### ' तायट कॉलरच्या ' माणसांनो

शब्दांचे निखारे सोडून आग कशाला लागत नसते :
आपण पुरते पेट घेऊन नंतर निखारे सोडायचे असतात
भावनांच्या पोळ्या वाढून पोट कुणाचे भरत नसते :
फळलेल्या झाडाची उदारता असावी लागते नसानसांत

' कोल्हेकुई 'नं भूल घालून टाळ्या घेणं कठीण नसतं
नंतर सिंहगर्जना करून त्यांना ' चूप ' बसवताही येतं
खताशिवाय हरितक्रांतीच्या बाता, म्हणजे नुसता भ्रम
हवेवरती घर बांधणारा निश्चित समजावा चक्रम

प्रकाशाचे स्तोत्र गाऊन अंधारच उबविणारे जास्त
' तायट कॉलरच्या माणसांनो ' दिवे असे लागत नसतात !

### कावळे

एकापेक्षा एक येथे बुद्धिवंत कावळे
कुणाचं सत्य कुणाचं सखोल हे ठरविणं महाकठीण.
दिवस जेव्हा परडी भरून फुले उधळतो
तेव्हा या कावळ्यांचा बाजार येथे सुरू होतो.

मीही कावळा होऊन ऐकतो यांची कावकाव
काय घडतं ते यांच्याचमुळं असा यांचा आविर्भाव.
शब्दांची पानं गळून पडतात एकावर एक
आकाश आटत जाते याचं त्यांना भान नसतं.

संग्रहालय ठाणे
दा. क.
काव्य

## रामदास प्रभू

### कातरवेळ

मागे मागे रेंगाळती
काही किरणे चुकार
धुंवारल्या दाही दिशा
रंग रंग एकंकार

ज्ञान अज्ञानाची सीमा
मिट्ट आले नेत्र नेत्र
जाणिवेच्या पलीकडे
सारा अंधार अंधार

ससोवती किण्ण सारे
नाही कुणाचा सांगात
आणि माझे असणेच
हारपते अनंतात

### प्रकाशाचे स्वप्न

प्रज्ञेच्याही पलीकडे
फुटणाऱ्या पहाटेची
स्फुरतात स्तोत्रे
गात्रगात्री

शुचिश्रांत प्रातःकाळी
प्रकाशाला आमंत्रण
निळाईत उषा
उजाडावी

उगवते नवे काही
कापूरल्या दिशादिशा
अंधाराच्या वाटा
शेंदुरल्या वाटेवर
माझ्या पावलांच्या खुणा
प्रकाशाचे स्वप्न
अंतर्यामी

## किती पाहू वाट

रात्रीच्या व्यथेने
खिरले चंदन
तुझे आगमन
होईल काय ?

संगीताची धून
धुंद आसमंत
रिघावा मनात
चैतन्याचा

क्षितिजापर्यंत
परागाची वाट
पाहू किती वाट
आतुरले

तुजसाठी लेणे
अहेवाचे लेणे
तुझे व्हावे येणे
अकस्मात

क्षण गात्रगात्री
फुलावी पुनव
विरावे अस्तित्व
उत्सवात

## नरेंद्र बोडके

### गाणे

एक गाणे माझ्या दाराशी घोटाळतेय् कधीपासून
मी दार उघडतो :
अस्पर्श वितळल्या उन्हाचे घर वाहत आत येते
मी गाण्याच्या डोळ्यांत पहातो.
अरे, माझेच हे डोळे
सर्वांतून नाकारला गेलो तेव्हा मीही असाच
दारोदार भटकत होतो

आज गाणे माझ्या दाराशी
॥ दाराशी येणाऱ्या गाण्याला कधी हाकलून लावू नये ॥
॥ घर विसरून जाऊ नये ॥

### मोहेंजदारो

दूरवरून दरवळत येणारी गाण्याची एखादी ओळ
अचानक रक्त घेरून येते; सुरक्षित जपून ठेवलेल्या मनाचे
ढासळतात बुरुज. खोल मातीत गाडलेले एक मोहेंजदारो हलकेच
तरंगून वर येते

या मातीत गाडलेले सारेच देह ओळखीचे : ह्या माझ्या आठवणी
जखमी लाटांचे समुद्र आणि मेलेल्या पावलांनी त्याच त्याच जुन्या
वाटांतून भोवंडणारी तू

म्हणालीस : ' गाण्यांच्या काळोखखोल गुहांतून
अरबी सुरसकथेतल्यासारखा अद्‌भुत प्रवास करून मी
पुन्हा तुझ्यापाशी आलेय. ' मी म्हटले : ' तसे ठीक आहे. पण
आजकाल एका खाऱ्या अश्रूसाठीही निविदा, फेरनिविदा
मागवाव्या लागतात. काळ बराच उलटला आहे '

अंधाराचे दडपण वाढत जाते. प्रत्येक देहाच्या तळाशी
मातीत खोल गाडलेले एक एक मोहेंजदारो अलगद तरंगून
किनाऱ्यापर्यंत. रक्त वाटांना शरण असते...

## सैगल

सेंदूतील काळोखाच्या झाडांचे अरण्य सैगलच्या स्वरांसारखे;
नग्न लाटांची घरे रक्तातून तरंगत निघालीत: ही प्रवासाची सुरुवात
आयुष्य उदंड फोफावले ह्या शहराबरोबरच, रस्तेही
हातात गिटार घेऊन आले. त्यांनीच ही गाणी दिली
आणि स्वप्नांचे नाळ कापून नेले
तसे आजवर दुःखांना शरण गेलो; कधी कोसळलोही. वादळांचे अमानुष हात
गळा घोटण्याच्या तयारीने आल्यावर.
माती खचत जावी तसे रक्त खचले; काळोखाचे पान पान गळत
दिवस मैलांच्या दगडांसारखे मागे पडत गेले आणि मी सारेच विसरलो :
माझे नाव, संदर्भ वगैरे
एक दिवस माझीच त्वचा सोलून मी अश्रुंचे झुंबर गाण्यातून पेरले
सैगलच्या स्वरांची शपथ घेऊन

## थंडाई

असे असावे गगन उन्हाळी
निळीत निर्मळ तुरळक तारा
पानोपानी झडत रहावा
गार गोरटा चांदण-पारा
माडांमधुनी हिंडत यावा
अंगावर सुखशीतल वारा
आणि कवडसे माळुन याव्या
छाया रात्रीच्या अभिसारा
सागरगर्जित मल्हाराची
यावी विस्तारत अस्ताई
पापण्यांत जळ जमत हळुहळू
जावी शमत उरातिल लाही
फळाफुलांचा वास पिकावा
कुहूकुहूची व्हावी घाई
चढल्या त्याच्या थंडाईने
सहज मीहि व्हावे उतराई

## पाऊस श्रावणी

पाऊस श्रावणी हासला बाई
लेवून जरतारी साज
आपण होऊन साजण तसा
अंगणी आला गे आज

आपाद भिजले आपाद लाजले
वाजले सुरूंचे रान
पुढल्या लाटांत मागल्या वाटांत
रंगास आले उधाण

वाळूत बैसल्या ठायीच गेले
लंघून सागर सात
दुपार असून सर्वांगी भोगिली
माघींची चांदणी रात

नुरले अंगण नुरला साजण
नुरले मीही स्वतांत
कापूर तेवढा तेवत होता
निवान्त निळ्या जळात

## गुलबक्षी

झेपावती वेडे झावळांचे पक्षी
सावळ्यांच्या वक्षी चांदण्याची नक्षी
झाकूनिया असे जे जे अंतरिक्षी
फाकिते ही माझी गंध गुलबक्षी

## वि. ज. बोरकर

### सांध्य प्रकाशात

सांध्यप्रकाशात स्निग्ध धूसरता झाडांची
तरणारी. अन् हलके हालचाल पानांची.
सांध्यप्रकाशात तुझ्या नेत्री हे चित्र उभे
ओघळती स्निग्धताच रूप तुझे
मावळणारी पश्चिम, भावस्फुट अधर द्वय
... रूप तुझे

सांध्य प्रकाशात स्निग्ध
हे इतुके
मोहमयी, हे इतुके
उडलेला पक्षि कुणी
अन् तुझिया ओठांवर ओठांचे दोन ठसे

### तुला जर मला फुलासारखेच

तुला जर मला फुलासारखेच जपायचे असेल
तर त्याला हळुवारपणे गोंजारणारा तू वारा हो.
तुला जर मला व्यथेसारखेच चुंबायचे असेल
तर माझ्या घरावर कोसळणारी प्रखरशी तू रात्र हो.

एका तेजःपुंज राजाने ग समारंभ केला
तेजाचा त्याच्या अर्धा वाटा तेव्हा मिळाला मला

तुला जर का तेज ते पहायचेच असेल
तर मला दंशून चुंबणारी आरक्तशी तू पहाट हो.

तुला जर मला व्यथेसारखेच चुंबायचे असेल
तर माझ्या घरावर कोसळणारी प्रखरशी तू रात्र हो.

वैराण या जागी इथे मी गातो राणी
ज्याने मला सूर दिले त्या पक्ष्याची तेजस्वी गाणी
तुला जर का ओळख त्याची हवीच असेल
तर सुगंधाच्या कळ्यांतली तू अंधाराची खूण हो.
तुला जर मला व्यथेसारखेच चुंबायचे असेल
तर माझ्या घरावर कोसळणारी प्रखरशी तू रात्र हो.

तुला जर मला फुलासारखेच जपायचे असेल
तर त्याला हळुवारपणे गोंजारणारा तू वारा हो.
तुला जर मला मुलासारखेच वाढवायचे असेल
तर मला कुशीत घेणारी स्नेहाळशी तू माय हो.

## चिमण्या

कोमल सकाळ
माळावर उठलेले चहूकडे चिमण्यांचे रान
माझा चिमुकला मुलगा खेळतो उन्हात
पाहतो एकेक चिमणी पकडू हातांत
त्या उडतात फडफडून.

चिमण्या नाजुक चिमुकल्या
चिमण्या टपोर कळीदार.
डोळे बिंदुसदृश, पंख अलवार
माझ्या मुलाला याचे काही नाहीच.

त्याला आवडते फक्त त्यांचे फडफडणे
आणि पुन्हा फडफडणे
... फडफडून उडालेल्या चिमण्या
येऊन बसतात पुन्हा थोड्याच अंतरावर

माझ्या मनात एक घरटे आहे
मलाच कळत नाही मी ते कधी बांधले
माझ्या मुलाला प्रथम पाळण्यात घातले
तेव्हापासूनही कदाचित असेल.
माझा मुलगा आहे तेथे शांत विसावलेला
आणि पाळण्याच्या दांडीवरच्या चिमण्याहि तेथे तशाच
फडफडून उडणाऱ्या

... माळावर
माझा मुलगा पाहतो पकडू चिमण्या उडून बसलेल्या पुन्हा.

## माझी वेदना

माझी वेदना ओथंबलेली आहे,
मनाच्या छपरातून झरत आहे ..
पण मीच तिचं निरीक्षण करते ना
त्या वेळी...
ती बावचळलेली दिसते.
तरीही ती अबोल आहे.
वेदना माझी घुसमटत राहते,
कुढत राहते
आतल्या आत...आत...आत...आत
तरीही तिला हुरहूर आहे.
आशेचा किरण
पुनः तिच्यात डोकावतोच
मग ती स्वप्नात धडपडते
घसरते
पुन्हा पडते.
दुःख वाहू लागतं, जखम होते...
म्हणून ती कष्टी होते,
पण...पुन्हा तिची न् आशेची
आंधळी कोशिंबीर...
बिच्चारी !

## सुदाम मोटे

### दिवाळी : काही खुणा

‘ मैदा, रवा, साखर आठ दिवसांपूर्वी गडप ’
‘ तेल, तांदूळ आणि इतर वस्तू ? ’
दर विचारून अवलक्षण.
सारांश : यंदा दिवाळीला जोर नाही.
मानवी मेंदूचे रंग आणि चूर्ण
सजवून आहेत दर्शनी काचपेटिका.
वस्त्रप्रावरणे, सौंदर्यप्रसाधने खुली केलेल्या काचात
डोळे खुपसून फक्त दृष्टिसुख घेणेच उरले हातात.
कारण : ते सारे रोकड, जकातचोरी, पोलीसशाही आणि कर.
या सर्वांच्या अलीकडचे आहे.
दिवाळीला अधूनमधून फटाके तडतडतात.
दारूकामाची आतषबाजी लखलखते दारोदारी
काजव्यासारखी.
तात्पर्य : दारूसामानाला उठाव नाही.
मनात निराशा दाबून
मुखावर उत्साह ओसंडत असतो.
मधे मधे हास्याच्या फैरीही झडतात.
पोह्यांचा प्रवास खूप होतो.
कपबश्यांचा किणकिणाट दुपारपर्यंत ताजातवाना राहतो.
त्यात एखाद दुसरा कप फुटतो.
कुठेतरी रस्त्यावर दोनचार करंज्यांचं पोस्टमार्टेम झालेलं असतं.
शेवचिवड्याचा तुरळक शिडकावही दिसतो.
सबब : दिवाळखोरी चालू असते.

वाजतगाजत आलेल्या दिवाळीच्या तीन दिवसांची वासलात
भूतकाळ कधी लावतो ते कळत नाही.
मात्र चौथ्या दिवशीच्या तिन्हीसांजेला घरोघरी माणसे बसतात,
प्रेतयात्रा संपवून आल्यासारखी
झळझळीत होऊन.

## शंकर रामाणी

### वारा इथे भरारा

वारा इथे भरारा; भानात रान आले
पानांत दाटलेले राघू कुठून गेले ?

स्वप्नात नागव्याने न्हाली नदीत झाडे
तळ चुंबुनी वहाते घननीळ कोण वेडे ?

श्वासात चांदण्याच्या फुटल्या मयूर वाटा
पायात का सखीच्या खुपतो अजून काटा ?

माझ्याच अंतराचे तू माळिले इशारे
सर्वस्व झोकुनी मी घेतो खुडून तारे...

प्रहरात पैंजणांच्या हृदयी पहाट झाली
आताच गोंदुनी घे तू पूर्णचंद्र भाळी

डोळ्यांत संथ पाणी; उठती कुठून लाटा ?
न्हात्याधुत्या दिशांचा दर्वारला चन्हाटा...

जा पौष पावलांनी; आले समीप गाव
दूरात जागृतीचा मिटल्या दिठीत ठाव...

मागीत जोगवा अन् दारात गंध ओले
आले उतू कुणाचे ओठावरी उन्हाळे ?

## अशा शिशिरवेळेला

गाई पिळिल्या पहाटे
आत हंबरते कोण ?
रान गोंधळले आणि
वेणू वाहते दुरून...

कशी अंतरीची खूण
झाली उलटीसुलटी
मख्ख गोरजधुळीची
भाळी उमटली उटी...

सांज रंध्रातून रुते
पुढे नोळखीचे दिवे
वाट चुकल्या गाईंचे
रडू दिशांत पालवे...

दुःख दावणीला जसे
रित्या गोठ्यात वासरू
अशा शिशिर वेळेला
कुठे काळीज अंथरू ?

## दिवे लागले

दिवे लागले रे, दिवे लागले रे
तमाच्या तळाशी दिवे लागले
दिठीच्या दिशा खोल तेजाळताना
कुणी जागले रे ? कुणी जागले ?

रित्या ओंजळी दाटली पुष्पवृष्टी
असे झाड पैलाड पान्हावले
तिथे मोकळा मी मला हुंगिताना
उरी गंध कल्लोळुनी फाकले...

उभ्या रोमरोमांतुनी चैत्रवाटा
कुणी देहयात्रेत या गुंतले ?
आरक्त त्याच्या कृपेच्या कडा अन्
उषःसूक्त ओठांत ओथंबले...

## अमिता अ. रायकर

### यशोदा

शरद दाटून आला होता
दूर पहाडी रागात बासरी थरकली होती;
सुरांची बरसात
लखलखणारे धारदार सूर
अन् झरझर चिरत जाणारा गहिरा काळोख,
आपली झाकली मूठ उघडत
झाकल्या सौंदर्याचं रसपान देत होता.
चांदण्याचं भुरभुरणारं जावळ कुस्करित
रात्र अंगाईत नहात होती, भिजत होती.
सावळ्या पदराबाहेर; खट्याळ डोळयांच्या काळयाशार बाहुल्या
क्षणी वेडावित तर क्षणी हासत
हसऱ्या तळयात
वात्सल्याची मोरपीसे लेवून
काजळकाळ्या उत्तरियात क्षणी गुप्त होत,
परत वेडावयाला, त्या यशोदेला वेड लावायला
जी युगानुयुगांचे हे नातं घेऊन युगंयुगं बसली होती
वळलेल्या रथाचं वळण पाहून
त्याच्यासाठी सावली होऊन...
पण ... ...
वळली मूठ अक्रूरानं सोडवली होती
परत न वळण्यासाठी
जाताना दिलेला हुंकार
ज्यांनी भिजविले अश्रू
असहाय मातृत्वाचे ...

अन् आता, राहिलेले हे सूर आणि
ज्याच्या कणाकणांत दडलंय असे ते बाल्य आठवित
चांदण्याचं भुरं भुरं जावळ कुरवाळणारी
एक यशोदा.

## वसंत शा. वैद्य

### व्यथा

तू म्हणसी गे !
मला पाहुनी नीज तुझ्या नयनीची
सरते......पळते......
अन् कातर वेळी
नावहि ओठांवरती...
स्फुरते......स्मरते......!
परंतु तुजला नाही जाणिव
खोल मनाशी काय पेटले
आठवणींच्या पाचोळ्याचे
करूनी सरपण
व्यथा मनाची ......
तगमग करिते ...... धगधग जळते।

### हे किती बरे !

शेजाऱ्याच्या घरात
माझी पुस्तके जातात
पण माझे विचार जात नाहीत
हे किती बरे !

शेजाऱ्याच्या घरचे लोणचे
माझ्या घरी कधी येते
पण त्याच्या घरची चव

येत नाही
हे किती बरे !

शेजाऱ्याच्या घरी
माझे वृत्तपत्र आणि वृत्त
रोजच जाते
पण माझे हृद्‌गत
जात नाही
हे किती बरे !

शेजाऱ्याकडील सोने रूपे नाणे
पहायला रोज मिळते
पण त्याचे शील
कळत नाही
हे किती बरे !

शेजाऱ्याच्या घरी
माझ्या पगाराचा तपशिल
माझे गोद्‌रेज
माझा बरशेन
कधी आले याचा हिशोब
त्यांच्या घरी
माझे दुधाचे कार्ड
शेजाऱ्याकडे
पण माझे दुःखाचे कार्ड
माझ्याच घरी
हे किती बरे !

## चित्रसेन शबाब

### थिव्यावरल्या सावलीला शोधीत

अवकाश हातांनी विकलेली फुले डोळयांत चमकून
डबडबला सागर पापणीभर पाणवठ्यावर
ओसाड गावचा वड ओघळला थिव्यावर, आणि
अनंत हातांनी वेचीत राघुमैनेची आरक्त फळं
पारावर उसळली मध्यान्ह; जिथे दोघीही थांबल्या होत्या
ओठ्यावर येताना कुजबुजत...
लाटांवर हिंदकळणारी एक वाट पिंजून फेकून दिलीस—
आणि मलासुद्धा दुसऱ्याच महिन्यात
मळमळून उलटी झाली...
फळांची खूप इच्छा होतेय,
ओटीभर फुलांनी माझाही गाव गंधाळलाय; आता ये—
ये, ह्या वाटेला सांगून ठेवतेय—
थिट्यावरच्या सावलीला शोधीत मृगासक्त डोळयांत...

## तुकाराम रामा शेट

### या आर्द्र डोळयांतून

मनातल्या ओलाव्यावर
आकारू पहाणारी हिरवीगार स्वप्नं
जीवनातल्या आगीत
तडकलेली स्वप्नाळू आशा
ध्यास घेतलेले हे आर्द्र डोळे
पण ते आकाश कोरडं
विमनस्क...

सिताराम शेटये

## आणि सावल्या संपलेल्या ....

अस्वस्थपणाच्या देठावर मन थांबतं तेव्हा,
संपून जाणाऱ्या सावल्यांचे प्राण
मातीतच संपतात
गळून जाणाऱ्या भावनांना शपथा घालतात
रक्तात भिनलेले जिव्हाळे
रस्ते एका तिस्कवर थांबलेले असतात चालून चालून
पुढे कित्येक वळणं रस्त्यांना तोडणारी
एक पक्षी बसलेला थिट्यावर
परतीच्या वाटेकडे बघत
रस्ते एकमेकांना कसे विसरतात
पण वळणांचे तुटलेले संबंध
संपल्यावर परतावंच लागतं
सावल्यांच्या वाटाही मातीत गडप.
पक्षी तसाच असतो घरट्यात जीव लावून;
पण कसे सोडावे थिट्याच्या रस्त्यांना
अस्वस्थपणाच्या देठावर मन थांबतं तेव्हा
तो पक्षी संपूर्ण विसरून जातो न संपणारे रस्ते,
फक्त ध्यानात असते, परतीची वाट
रस्ते बापुडवाणे,
आणि
सावल्या संपलेल्या.

## आता माझे डोळे काजवे झालेत

आठवांच्या घनदाट अंधारात
माझे डोळे काजवे झालेत
गरगरून येणारी झाडं
मातीच्या नसनसात भिनलीयत
समोरचा ग्लास फेसाळतोय
संपूर्ण जीवनाचा अर्धवट सागर राहावा
गच्च भरून......
सभोवताली गाज आदळून आदळून...
कोण येणार आहे आज
स्वप्नांच्या किनाऱ्यांवर फेसाळायला ?
तुझी राहिलेली एकच शेवटची आठवण
आता बरीच अंधारलीय
आठवांच्या घनदाट अंधारात माझे डोळे
काजवे झालेत.
अंगातून पेटणारे आकाश, रेकलंय
समोरच्या उंच बिल्डिंगवर
तू अशीच टेकायचीस
' सागर संपला, समाप्त झाला तर आम्ही किती,
पुढं जाऊ ? '
तू म्हणायचीस,
अजून संपतच नाही गाज
ती एक आठवण,
अशक्त बनूनसुद्धा,
रेंगाळलेल्या लाटेसारखी फेसाळतेय;
ग्लासातला सागर अर्धवट,
फेसाळायचा थांबला
आणि
आठवांचे घनदाट अंधार
आता माझे डोळे काजवे झालेत.

## द्वारकानाथ शेंडे

### झुइगंधाला नकळत ग

वादळात सखि, काल अचानक स्वतःस झोकुन दिधले ग
बघता बघता मुंबई लवता वादळ माझे झाले ग...
चढत्या रात्री दीप दवडुनी
नसेन फिरले तोच साजणी
वादळले मी वादळ बघुनी
घन अंधारी सुटल्या बुंथी दुरावलेपण सरता ग...

वादळात मी, वादळ देही
विसावले क्षण सुखावलेही
वादळ होते पंख पसरुनी
उधळित जीवन फुलवित कणकण झुइगंधाला नकळत ग...

कोण कुणाला भिडले हरले
पैल हिशोबा विश्वच तिथले
कुडीत घेउन गीत उद्याचे
सखि, मी होते व्रतस्थ बनले फूल कळीचे होता ग...

### गणगोत म्हणो मज वेडा

मज काहि न त्याचे गणगोत म्हणो मज वेडा
हे वेड जयाचे मम 'मी' तो वेडा का देहुडा?...

आजवरी मी गिरवित आलो वळवित एक धडा
सर्वांभूती एकच अक्षर ' मी ' आभाळाएवढा...
चाळीस सरली आयुष्याची लढता जीवनलढा
माथ्यावरती पिकले अनुभव घेता घेता छडा...
स्मशान पाहिले क्षणि ज्या हा हो चौहाती नागडा
उवड्यावरती स्वर हो घुमतिल टाकित गंध सडा...

## आपुल्यातच आपुल्याला

लाख साथी आज येथे असून माझ्या संगतीला
एकलेपण जाणवे का नाकळे या मन्मनाला...
हासणारे धनिक असता रंगभरल्या मैफलीला
का हवेसे एकलेपण जाहलेले मेनकेला...
माना तैसा अर्थ तोही वश्य असुनी क्षणक्षणाला
का शिरीचे छत्र टोचे राजगृहीच्या स्थैर्यतेला...

मार्ग सारे धुंडिले मी भेटलो अन् यात्रिकांना
माळुनी ते पूर्ण मौना शब्द नव्हते शांततेला...
उमजुनी हे, शोधिले मी आपुल्यातच आपुल्याला
अन् क्षणी त्या जाग आली झोपलेल्या अजगराला...

## शशिकांत सरदेसाई

### स्मृति

आठवते का
ती रात साजणे ?
भिजली जेव्हा
रानपाखरे—
अन् थरथरली
होती माती !
म्हणालीस ना तू
घेऊन जखमी
ओठांना हाती
" पुरे अता रे
किती अनावर
होशील या राती " !
ऐकून हसली
क्षणभर ती
गवताची पाती;
अन् गवतही
झाले वेडे
त्या राती.

## अशीच एक संध्याकाळ !

अशीच एक संध्याकाळ !
भारावलेला वारा
दूरवर शुक्र तारा—
अन् वाटेत तू !
अगदी अचानक !
साता जन्माची ओळख
असल्यासारखी !
सावळा ( का काळा ) रंग,
सरळ नाक–करारी म्हणतात,
गोड डोळे–थोडे पाणावलेले
बत्तीस दात– हिशोबाला एकही
कमी नाही !
कुरळे केस– नीटस बांधा
मी बोलतो– तू हसतेस !

अशीच एक संध्याकाळ !
तुला रडायला येते हे
मला नवीनच कळले,
आषाढातल्या सरीगत
बरसत होतीस !
डोळे सुजले, नाक चोंदले
तरी हुंदक्यांची खैरात
थोड्या वेळानं आकाश
निरभ्र होतं. रडायचं कारण ?
काही नाही ?
सहज रडू आलं !

अशीच एक संध्याकाळ !
गैरसमजुतीचे वारे वहाते,
ताठर भावना फणा काढतात !
समेटाची इच्छा असते
परंतु अहंकार फुत्कार
टाकत असतो !
वातावरण क्षुब्ध असते,
आणि मग मीपणाला
तडा जातो !
आणि दोन मनं
जवळ येतात,
भावनांचा पूर घेऊन !

अशीच एक संध्याकाळ !
भविष्याच्या झोपाळ्यावर
झोके घेते मन !
आभाळातला पुनवेचा
चंद्र कल्पनेच्या
दर्याला भरती आणतो !
छोटेसे घरकुल त्यात तू अन् मी
आकाशगंगा, तारे गंधावलेले श्वास
न ढळणारा विश्वास !
सगळं येतं—
येत नाही फक्त कठोर वर्तमान !

अशीच एक संध्याकाळ !
शांत, भूतकालाच्या आठवणींनी
ओथंबलेली,
शब्दांच्या दुनियेत

द मुके होतात !
ारा पुनवेच्या साक्षीने
स्पर्शसुद्धा भारावतो !

अशीच एक संध्याकाळ
ज्या वेळी माझ्या जीवनाची
पहाट सुरू होते तुझ्यासमवेत.

अशीच एक संध्याकाळ !
गैरसमजुतीचे वारे वहाते,
ताठर भावना फणा काढतात !
समेटाची इच्छा असते
परंतु अहंकार फुत्कार
टाकत असतो !
वातावरण क्षुब्ध असते,
आणि मग मीपणाला
तडा जातो !
आणि दोन मनं
जवळ येतात,
भावनांचा पूर घेऊन !

अशीच एक संध्य,काळ !
भविष्याच्या झोपाळ्यावर
झोके घेते मन !
आभाळातला पुनवेचा
चंद्र कल्पनेच्या
दर्याला भरती आणतो !
छोटेसे घरकुल त्यात तू अन् मी
आकाशगंगा, तारे गंधावलेले श्वास
न ढळणारा विश्वास !
सगळं येतं—
येत नाही फक्त कठोर वर्तमान !

अशीच एक संध्याकाळ !
शांत, भूतकालाच्या आठवणींनी
ओथंबलेली,
शब्दांच्या दुनियेत

शब्द मुके होतात !
वारा पुनवेच्या साक्षीने
स्पर्शसुद्धा भारावतो !

अशीच एक संध्याकाळ
ज्या वेळी माझ्या जीवनाची
पहाट सुरू होते तुझ्यासमवेत.

## शहाजी बापू साखळकर

### तीन अभंग

१

तुजवीण नाही मज कोणी आता । अनाथांच्या नाथा मायबापा ॥
नाही मज माता नाही मज पिता । बहीण-बंधु-चुलता नाही कोणी ॥
संसारी झालो अती दुःखादुःखी । तुझ्याविण सुखी कोण करी ॥
नाही मी मागत धन आणि ऐश्वर्य । अन्न आणि वस्त्र देई सदा ॥
इतुकेही देऊनी नाही मज सुख । मनातील दुःख कैसे सांगू ॥
म्हणोनी मी आता मागतसे देवा । घरातील दिवा लावी आता ॥

२

काय करू देवा कुठे जाऊ आता । तुजविण आता कोणी नाही ॥
धाव बा अनंता कृपाळु होऊनी । लक्ष्य तुझ्या नामी लागे माझे ॥
तुझे नाम घेता जळती पापराशी । उद्धरोनि जाती स्वर्गलोकी ॥
पतितपावना पातकी मी खरा । माझिया उद्धारा धाव आता ॥

३

काय सांगू मी या जन्माची कहाणी । पापांच्या या खाणी झाल्या माझ्या ॥
विषयवासनेच्या पडलो आहारी । धाव गा श्रीहरी पांडुरंगा ॥
रात्रंदिन तुझा न पडो विसर । पापांचा संहार व्हावा माझ्या ॥
नको पाहू अंत कृपाळु परमेशा । धाव हृषिकेशा पांडुरंगा ॥
शहाजी म्हणे देवा करितो विनंती । मोक्ष द्यावा अंती तुझिया नामे ॥

# सुनिता साखळकर

## पक्षी

तिच्या सबंध अंगावर
टवटवीत, भरगच्च दाट पानं
वेलीवर झुलणारी फुलं
अन् गंधित सुवास
वाऱ्याच्या मदभरानं वाकायची मस्त
प्रभातसमयी दही सांडायचं
वाटेवर...
ती
वाट पाहून थकली
बहरलेल्या फांद्या कलंडल्या
तिची काया
वितळून गेली
सूर्यगंधानं,
पण तो रंगीबेरंगी पक्षी
आलाच नाही...

## विजय सातपुते

### नथिंग मोअर

प्रिय मित्रा
दादांच्या मृत्यूनंतरचा
पिठलं भात
वास्तविक ते माझे वडील
पण मीच चवीनं खाल्ला
आठवायचे कारण म्हणजे
काल झालं काय
रात्री जेवताना माझी बायको
होय वन्दू म्हणाली,
" अगदी साधाच बेत
छान झालंय ना भात पिठलं ? "
त्यावेळी धाकटा छोकरा
माझ्या मांडीवर झोपला होता
बोटांनी त्याचे डोळे उघडून पाहिलं
ही जशी माझ्या मध्यमवर्गीय वृत्तिची कुरूपता
तशीच ऐकताना पृथ्वीला कीड लागावी
अशा तऱ्हेच्या एकाकी करून टाकणाऱ्या गोष्टी
जेवतानाच सांगायची माझी पद्धती
म्हणजे जगातल्या सर्वच लुटारू वृत्तींच्या
धर्मग्रंथातील कुरूप शपथ घातल्यासारखी
भयानक प्रकरणे : प्रचंड दरारा
असंच काहीसं आठवल्याच्या भीतीने
वन्दूनं माझ्या मांडीवरून त्याला ओढून घेतलं

खरं सांगायचं तर
कोणत्याही बायकोनं नवऱ्याशी
असं एकान्तात
अन्नाच्या चवीवर बोलू नये !

अरे हो ! सांगायचं विसरलंच
परवा संगम भेटला
ऐक्स्ट्रीमली नर्व्हस होता
रात्रभर रक्तात भिजवला
तर
पाटाच्या पहिल्या पाण्याकडं बघून
हळदीनं जसं तरारावं
तसं पहाटे पहाटे म्हणाला,
" होतोय या वर्षी डॉक्टर
अलबर्ट श्वाईत्झर !
यंदा गावात ऊस लागणार नाही
उभ्या गावात डॉक्टर पेरतो
बेणं करून
देशादेशांत फुकट वाटतो..."

वडिलांच्या मृत्यूनंतरची
प्रचंड भूक भागवणाऱ्या
पिठलं भाताच्या रक्ता !
तुझ्यात एवढं सामर्थ्य कुठलं
की रोग पेरला असता
पीक उगवतेय !

अरे ! रक्ताचे झरे प्रचंड वाढलेत
उद्या तुझ्याकडे निघतोय

माती कोसळायच्या आत
विहीर घेऊन !

बट डियर आय ॲम अफ्रेड !
हे ऊस लावणारे लोक
विहिरीच्या बुडातून
असे ओरडतात
की
काठावरच्याला वाटावं
आकाश खाली आहे !
नथिंग मोअर

## उत्खनन

१

माझ्या रक्तेच्छांच्या संस्कृति लयास गेल्यानंतर;
बनलेल्या मला, खणण्यासाठी;
संध्याकाळच्या माझ्याच इतिहास संशोधकवृत्ती
सूर्यास्ताच्या मुहूर्तावर, कातर–कुदळींनी सज्ज झाल्या;
तेव्हा माझ्या रक्तवृत्तीनं घोषणा दिली—;
" वर्तमानाच्या झेंड्याखाली
बंड पुकारणाऱ्या नपुंसक वृत्तींनो !
मोहेंजोदारो–हरप्पांच्या संस्कृतिनिर्मितीसाठी
झिजलेल्या, हातांमागील रक्तवृत्तींची
संदिरे उभारली जाणार असतील,
तर स्वतःला उकरून घ्यायला माझी हरकत नाही. "

२

उत्खननातून
उदय पावणाऱ्या संस्कृतीच्या,
जनकाच्या बेवारशी मृत्यूनंतरहि;
त्याच्या पुण्याईवर
आम्ही : इमानी
भाकरीचा तुकडा
वासनांच्या अत्युत्कट बिंदू अगोदरच मिळवितो.

३

माझ्या रक्तवृत्तींचे उदय पाह्यचे असतील,
तर—
वर्षानुवर्षानंतर होणाऱ्या
माझ्या उत्खननाची वाट पहा.
जर—
माझ्या रक्तेच्छांच्या रक्तबंबाळ संध्याकाळी
होणाऱ्या माझ्या उत्खननाची वाट पाहण्याची
तुझ्यात हिम्मत नसेल;
तर—
तुझ्या माझ्यातील अंतर
अटळ आहे.

## हिवाळ्यातील कविता

पक्ष्यांना
ज्यात
जीव घेऊन
मुक्त भटकताना

जीव अपुरे वाटावेत
असे
तुझे
हिवाळयातल्या
हिरव्या ओल्या
उन्हाचे डोळे ...

जीवनातल्या
न समजणाऱ्या
दिशांतून भटकताना
समोरून
स्वतःलाच येताना पाहिल्यावर
ज्यातून
दहा सूर्योदय व्हावेत
अशा व्याकुळ दिशा
तुझी बोटे ...

जन्म : मृत्यू
यांच्यामधलं
लाभलेलं जीवन
जसं
सौंदर्याचा साक्षात्कार
संत
तुझं : माझं
उगवलेलं नातं...

अनिल सामंत

## तीन पिसे

१

सावलीनं मला अव्हेरलं तेव्हा,
माझ्या मीच पायांनी सरपटत राहिलो
...तेव्हा उन्हानं मला अस्तित्वाचं घर दिलं
आणि मी कविता झालो.

२

रंगीबेरंगी दुनियेत स्वतःला बेभानपणे झोकून
क्षणभर पावलांना ताल बहाल केले.
आणि आयुष्याच्या ओठांनी,
आभाळाचं गाढ चुंबन घेण्यासाठी मी पुढं सरलो.
पण—
अडखळणारे पाय सावरताना
माझ्या हातांत फक्त क्षितिजाची काळीभोर छाया आली.
...रात्र व्हायला तसा अजून अवकाश आहे.
माझी रंगीबेरंगी दुनिया इतस्ततः विखरून गेलीय.
उरल्या आहेत
फक्त—
आकाशाच्या अनंत काचा !
रक्तबंबाळ पावलांनी मी पळतो आहे.

३

रडता रडता अश्रूच मला हसले
आणि मी रडायचा थांबलो.
तेव्हापासून मी हसतच आहे.
आता माझ्या गालांना सुंदर खळ्या पडतात
सभेत फोटोसुद्धा तसे छान येतात.
...एकूण मी चांगला हसतो.
परवाच डॉक्टर म्हणाले—
अहो अमुक अमुक, तुम्ही हसणं थांबवा
हृदयविकाराचा तिसरा झटका यायच्या आत !

## वारूळ

ओलावल्या गालांची फुलं कोमेजून गेली
तीट चंद्राची कपाळी आता आटाया लागली

बाई पदराला तुझ्या नाही द्रौपदीची धार
अशी ओलेत्या अंगानं नको गाठू दरबार

कान्हा झोपला गोकुळी हात राधेच्या वेणीत
तुझ्या आंबाड्याला आधी माळ गच्च गंगावन

गोऱ्या पावलांची लाट जरा सावकाश लोट
ओठी येताना हुंदके ओत शराबीचे घोट

'नको डोळयांत पाऊस असं इंद्राचं वादळ
बाई वाहून जाईल तुझं मातीचं वारूळ...

## कळप

या कळपातून पळावे तर जावे कोठे
जिथे तिथे वठल्या गवतांचे शेणगोटे.

कोपऱ्याकोपऱ्यात वाट पाहणारी सहस्र दावी
घाणीनेच बरबटलेल्या इथल्या अवघ्या वाटा
कुणासाठी हंबरावे आभाळ फाटून जाईल इतके ?
गल्लीगल्लीत अडविणारे हे खाटिकखाने,
कुठे कुठे म्हणून चुकवाव्यात माना ?

नांगर नाकारावा तर नाकात वेसण आहे
मांगर हाकारावा तर डोळयांत ढापण आहे
कुणाकुणाचे म्हणूत चुकवावेत चाबूक ?

आता कळपात आहे...तर चालायलाच हवे
कळपासोबत ! कळपात राहायलाच हवे
कळपच व्हायला हवे !

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
दा. क्र. 22148
काव्य 5584
23307

**आंगले, नीलिमा व्यंकटेश** / जन्म : ५ जानेवारी १९४८.
शिक्षण : बी. ए.ला मराठी हा प्रमुख विषय. ‘ चंदाताई ’ ( १९७४ ) या बालगीत-संग्रहास गोवा कला अकादमीचे १९७३–७५ चे पहिले पारितोषिक. लेखनाचा छंद आठव्या वर्षापासून. कविता, निबंध, लघुकथा इत्यादी विविध वाङ्मयप्रकारांत पारितोषिके. पत्ता : आत्माराम बोरकर रोड, पणजी.

**कामत, हिरालाल माधव** / जन्म : २७ जानेवारी १९३८.
व्यवसायाने सिव्हिल इंजिनिअर. गोमन्तक, सागर, सुगंध आदीतून कविता प्रसिद्ध. पत्ता : रायबंदर, गोवा.

**कारे, दामोदर अच्युत** / जन्म : ४ मार्च १९०९.
गोमंतकातील जुन्या पिढीतील एक श्रेष्ठ व ज्येष्ठ कवी. ‘ नन्दादीप ’ हा कवितासंग्रह १९३४ मध्ये प्रकाशित. इतर लेखन असंग्रहित. मडगाव येथे मुद्रणव्यवसाय.

**कासकर, श्रीकांत** / जन्म : २९ मे १९५०, वेंगुर्ला तालुक्यात मातोंड येथे.
शिक्षण : बी. ए. ( ऑनर्स ). विविध नियतकालिकांतून लेखन. सध्या दैनिक गोमन्तक-मध्ये उपसंपादक.

**कुडतरकर, अवधूत** / जन्म : ११ ऑगस्ट १९५१, पेडणे येथे.
अनेक किशोरकथासंग्रह व बालगीतसंग्रह प्रकाशित. ‘ सांजवेळ ’ ही दैनंदिनी प्रकाशित. पत्ता : वारखंड, पेडणे गोवा.

**कुर्डीकर, राम विष्णू** / जन्म : २९ डिसेंबर १९२३, रोजी शिरोडा ( गोवा ) वखले येथे.
‘ गोमन्तक ’, भारतमित्र शिवाय इतरही अनेक नियतकालिकांतून अनेक वर्षे कविता-लेखन. पत्ता : मळा, पणजी गोवा.

**कुलकर्णी, मुरलीधर**
कवितालेखनाबरोबरच कथालेखनही आवडते. ‘ थोरला ’ हा कथासंग्रह प्रकाशित. सध्या धेंपे कला व विज्ञान महाविद्यालय, पणजी येथे मराठीचे प्राध्यापक.

**केणी, निरूपमा सावळी** / जन्म : २५ जानेवारी १९५१ रोजी मडगाव येथे.
‘ गोमन्तक ’ मधून अनेक वर्षे काव्य-लेखन.

**सौ. कौराते, मधुरा**
अनेक वर्षे गोमन्तकीय नियतकालिकांतून सातत्याने काव्यलेखन. शिक्षण : कादंबरीस पर्यंत. समीक्षालेखनाचाही यशस्वी प्रयत्न.

**गुरव, नयना** / जन्म : २४ मे १९५६, मुंबई येथे.
विविध नियतकालिकांतून कवितालेखन. सध्या दैनिक गोमन्तकमध्ये.

**जोग, गजानन** / जन्म : ९ ऑक्टोबर १९५२, साकोर्डे येथे.
विविध नियतकालिकांतून कवितालेखन. व्यवसाय तार व टपालखात्यात.
पत्ता : ई २१९, रु आ द फॉस द अलबुकर्क, पणजी.

**ठाकूर, विठ्ठल श्रीकांत** / जन्म : ७ डिसेंबर १९५६, आमोणे ( गोवे ).
गोव्यातील विविध नियतकालिकांतून गेल्या चार-पाच वर्षांपासून कवितालेखन प्रकाशित. सध्या धेंपे कला व विज्ञान महाविद्यालयात इंटर-सायन्सच्या वर्गात.

**तुडकोडकर, सुधीर म.** / जन्म : ८ एप्रिल १९५३ रोजी बेळगाव येथे.
सध्या वास्तव्य गोव्यात. मार्ग परिवहन खात्यात नोकरी. 'उत्तम कथा' मासिकाच्या स्पर्धेत कथेला पहिले बक्षिस. 'गावकरी', 'वैखरी', युगवाणी, अनुराग, प्रतिष्ठान आदीतून कविता प्रसिद्ध.

**तळवणेकर, द. वा.**
गोमन्तकीय नियतकालिकांतून वेळोवेळी वैशिष्ट्यपूर्ण काव्यलेखन. काही कविता ठिकठिकाणच्या स्पर्धांमध्ये उल्लेखनीय ठरल्या.

**तेंडुलकर, शिवानंद** / जन्म : २२ जुलै १९५७ रोजी.
'लोकप्रभा', 'गोमन्तक' आदीतून कविता प्रसिद्ध. लाऊडस्पीकर या लघु अनियतकालिकाचे संपादन. काही कथांना पारितोषिके.
पत्ता : फेयर वायरा—म्हापसा, गोवा.

**देशप्रभू, शरदच्चन्द्र आनन्दराव** / जन्म : १ नोव्हेंबर १९४८ रोजी.
'नवयुग'च्या स्पर्धेत 'टँटलस' या कवितासंग्रहास पारितोषिक. ना. भा. नायक-संपादित 'गोमन्तकीय मराठी पद्य' या प्रातिनिधिक संग्रहात कविता समाविष्ट. विविध विषयांवरील पद्य-लेखनही प्रसिद्ध. पत्ता : घर नं. २४०, देना बँकेजवळ, पणजी.

**नरेश, शरद** / जन्म : ५ नोव्हेंबर १९५१.
कविता, कथा—लेखनाबरोबरच चित्रे काढण्याचा छन्द. विविध नियतकालिकांतून लेखन. व्यवसाय : स्थापत्यशास्त्रज्ञ, मडगाव येथे.
पत्ता : C/o डॉ. नरेश कवडी, ६८८. विद्यानगर, मडगाव ( गोवा ).

**…श बा.** / जन्म : ६ ऑगस्ट १९५४, शेळवण, कुडाळी ( गोवा ) येथे. …ए. च्या वर्गात अभ्यास. नियतकालिके व आकाशवाणीवर कविता लेखन …वन.

**परुळकर, शंकर** / जन्म : ९ जून १९३८, चिमल, गोवा येथे.
विविध नियतकालिकांतून लेखन. पत्ता : किर्ल वाडा, चिमल, गोवा.

**परब, दशरथ का.** / जन्म : १९ डिसेम्बर १९५२, कोठंबी ( ता. डिचोली ) येथे. शिक्षण सरकारी उच्च विद्यालय सावई-वेरे येथे. पी. राज व दशरथ परब या नावांनी कवितालेखन प्रकाशित. सध्या अर्थशास्त्र हा विषय घेऊन चौगुले कॉलेजात बी. ए. च्या वर्गात. ' उन्मेष ' या कवितेला वाहिलेल्या मासिकाचे संपादन.

**पवार, बा. सा.** / जन्म : १ जून १९४६.
व्यवसाय- टेलिफोन ऑपरेटर, मडगाव येथे. ' शिरशिरी ' हा कथासंग्रह १९७२ मध्ये प्रकाशित. विविध नियतकालिकांतून कवितालेखन. आकाशवाणी पणजीवर कवितावाचन.

**पाटील, परशुराम**
निवडक कवितांचा ' चाहूल ' हा कवितासंग्रह प्रकाशित. शिक्षण एम. ए. पर्यंत. सध्या मोरजी पेडणे येथे शिक्षक.

**पाडगावकर, प्रकाश दामोदर** / जन्म : ४ डिसेम्बर १९४८, मुंबई.
शिक्षण : बी. ए. ऑनर्स. कोंकणी व मराठी कवितालेखन, ' उजवाडाची पावलं ' हा कवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर. गोमन्तक विद्यानिकेतन मडगाव या संस्थेने १९७१ मध्ये कॉलेज विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या कोंकणी आणि मराठी कवितांना दोन्ही प्रथम पारितोषिके.
पत्ता : लिसेरा जवळ, घर क्रमांक ई-३१४, पणजी.

**प्रभू, रामदास** / जन्म : २२ फेब्रुवारी १९३७ रोजी, माशेल येथे.
वास्तव्य सध्या मुंबईत. ' शब्दुली ' हा कवितासंग्रह १९६४ साली प्रकाशित. ' गोमन्तकीय मराठी कविता ' व ' गोमन्त शारदा ' ह्या प्रातिनिधिक कवितासंग्रहांचे संपादक.

**बोरकर, बाळकृष्ण भगवंत** / जन्म : १९१०, बोरी येथे.
जीवनसंगीत, दूधसागर, आनंदभैरवी, चित्रवीणा, गितार, चैत्रपुनव आदी संग्रह. ' बोरकरांची कविता ' हा अनेक काव्यसंग्रहांचा समावेश असलेला कवितासंग्रह. १९६७ साली पद्मश्रीचा बहुमान.

**बोरकर, विष्णु जयवंत** / जन्म : १९३६ मध्ये, मडकई येथे.
वास्तव सध्या मुंबईत. सत्यकथेतून अनेक वर्षे कवितालेखन. 'अनाहत' कादंबरीस कला अकादमीचे १९७५ चे द्वितीय पारितोषिक.

**मुंज, माधुरी** / जन्म : १४ डिसेंबर १९५४.
सध्या एम्. ए. च्या वर्गात शिक्षण. गोमंतकीय नियतकालिकांतून कवितालेखन.
पत्ता : स्टेशन रोड, मडगाव.

**मोटे, सुदाम** / जन्म : २३ फेब्रुवारी १९४८ सन्माळ ( तोर्से ), ता. पेडणे येथे.
शिक्षण : बी. ए. व बी. एड्. सध्या मराठी प्रमुख विषय घेऊन पदव्युत्तर केंद्रात एम्. ए. चे शिक्षण. व्यवसाय : म्हापसा येथील ज्ञानप्रसारक विद्यालयात शिक्षक. विविध नियतकालिकांतून कवितालेखन व पारितोषिके.

**रामाणी, शंकर** / जन्म : २६ जून १९२३, वेरे येथे.
सध्या नदी परिवहन खात्यात हेडक्लार्क. 'आभाळवाटा' या कवितासंग्रहास महाराष्ट्र सरकारचे १९६७ / ६८ चे कवि केशवसुत पारितोषिक.

**रायकर, अमिता** अ. / जन्म : ११ मार्च १९५२.
शिक्षण : बी. ए. ( अर्थशास्त्र ). कवितालेखनाबरोबर कथालेखनाचीही आवड.
पत्ता : C/o श्री. अच्युत ज. रायकर, पर्णकुटी, मुरगेले, वास्को.

**वैद्य, वसंत शां.** / जन्म : १३ मार्च १९२४, संकेश्वर, बेळगाव येथे.
मूळ गाव सोलापूर. येथेच महाराष्ट्र साहित्य परिषद शाखेच्या चिटणीसपदी अनेक वर्षांची सेवा. पाच कथासंग्रह व 'जलधारा' हा कवितासंग्रह प्रसिद्ध. 'अजीब लोकांचा राजा' पुस्तकास ७५–७६ चे कला अकादमी द्वितीय पारितोषिक.
पत्ता : रायबंदर गोवा. सध्या 'गोमन्तक'मध्ये उपसंपादक.

**शबाब, चित्रसेन** / जन्म : २५ ऑक्टोबर १९४५.
मूळ नाव सुतार य. बा. व्यवसाय-सरकारी हायस्कूल वाळपई ( सत्तरी ) येथे शिक्षक. शिक्षण–चित्रकलेतील ए. एम्. व जी.डी. आर्टस्. डिप्लोमात म्हैसूर राज्य पारितोषिके. कवितेबरोबर कथालेखन.

**शेट, तुकाराम रामा** / जन्म : ३१ जानेवारी १९५२ रोजी वळवई येथे.
धेंपे कला व विज्ञान महाविद्यालयात ज्यू. बी. ए. च्या वर्गात. अनेक गोमंतकीय नियतकालिकांतून काव्यलेखन. काही निबंधांना पारितोषिक.

**शेटये सीताराम ल.** / जन्म : १५ मे १९५०, मोरजी, पेडणे येथे.
गोव्यातील बहुतेक नियतकालिकांतून कविता प्रसिद्ध.

कानाथ / जन्म : ८ मार्च १९३२, देवरूख, ( रत्नागिरी जिल्हा ) येथे.
साहित्य : कोंब ( कविता ), १९६५ व मृदंगी (कविता) १९६९. 'मृदंगी 'ला अकादमीचे १९७३ चे पारितोषिक. 'पाथेय' या शिक्षक संघाच्या मासिकाचे प्रथम संपादक. मराठीबरोबरच हिंदी कवितालेखनही.

**सरदेसाई, शशिकांत ल.**
धेंपे वाणिज्य महाविद्यालय पणजी, येथे अर्थशास्त्राचे प्राध्यापक. कविता, कथा, एकांकिका इत्यादींचे लेखन. अभिनय व दिग्दर्शन, याबद्दल कला अकादमी स्पर्धेत पारितोषिके.

**( कै. ) साखळकर, शहाजी बापू**
मडगाव येथील चौगुले महाविद्यालयात चतुर्थ-वर्गीय सेवक होते. तीन वर्षांपूर्वी निधन. कवितालेखनाबरोबर नाटके बसविणे व नाटकांत काम करणे यांचीही त्यांना आवड होती.

**साखळकर, सुनीता** / जन्म : ५ फेब्रुवारी १९५६, वास्को येथे.
विविध नियतकालिकांतून व आकाशवाणीवर कविता-लेखन व वाचन.

**सातपुते, विजय**
वास्को येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक. सत्यकथा, प्रतिष्ठान इत्यादी नियतकालिकांतून कविता व कथा लेखन. नाट्य व अभिनय यातही ते रस घेतात व त्याबद्दल त्यांना अकादमीच्या नाट्य व एकांकिका स्पर्धांत पारितोषिके.

**सामंत, अनिल ग.** / जन्म : १६ सप्टेंबर १९५६.
सध्या सेंट झेव्हियर कॉलेज म्हापसा येथे शिक्षण सुरू. चिल्ड्रन्स फिल्म सोसायटीने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय निबंधस्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक. कॉलेज वार्षिके, नियतकालिकांमधून कविता, नाटिका इत्यादी लेखन. पत्ता : C/o शिवराम मागकर, खोर्ली–म्हापसा ( गोवा )

■

## संपादक परिचय

**वडेर, प्रल्हाद** / जन्म : ४ मार्च १९२९, निपाणी ( जि. बेळगाव ) येथे.

चढण ( १९६२ ) व वीज ( १९७३ ) हे दोन कथांचे संग्रह प्रकाशित. दोन्हींनाही कला अकादमीची प्रथम पारितोषिके. त्याशिवाय 'पं. महादेवशास्त्री जोशी, एक अभ्यास' व फुलवा महाविद्यालयीन मराठी व कोकणी प्रातिनिधिक कवितासंग्रह यांचे संपादन. प्रा. ना. सी. फडके यांच्या समग्र साहित्यावर प्रबंधलेखन पूर्ण केले आहे. कथेशिवाय एकांकिका, ललितलेख, टीका इत्यादी लेखन. पणजी येथील पदव्युत्तर केंद्र ( मुंबई विद्यापीठ ) येथे मराठीचे प्राध्यापक.

**बोडके नरेंद्र** / जन्म : २३ डिसेंबर १९५४ रोजी, मुंबई येथे.

'सत्यकथा', 'प्रतिष्ठान', 'मागोवा', 'किर्लोस्कर', 'सह्याद्री', 'वैखरी', 'युगवाणी', 'महाराष्ट्र टाईम्स', 'शब्दसार', 'अस्मितादर्श', 'अभिरुचि' आदी महाराष्ट्रातील सर्व दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकांतून कवितालेखन. अनेक कवितांना पारितोषिके. 'पाणंद' या गोव्यातील पहिल्या छापील लघुअनियतकालिकाचे संपादन. 'सलोखा' या त्रैमासिकाचे काही काळ संपादन. सध्या पणजी येथे दै. गोमंतकमध्ये उपसंपादक.

REFBK-0022149
REFBK-0022149

# गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पणजी

## आमची प्रकाशने

**स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय मराठी कथा**

संपादक
प्रा. रविंद्र घवी
श्रीकांत कासकर

गोमंतक स्वतंत्र झाल्यानंतरच्या गेल्या पंधरा वर्षातील नव्या तरुण पिढीच्या तसेच प्रतिथयश कथाकारांच्या प्रतिभेचे नवे उन्मेष. अभ्यासपूर्ण प्रस्तावनेसह

मूल्य आठ रुपये.

**पंखपैल**

नरेंद्र बोडके

जीवनातील व्यथा आणि काळोख यांचा मागोवा घेणारा गोव्यातील तरुण कवींच्या अठ्ठेचाळीस कवितांचा पहिलाच लक्ष वेधून घेणारा संग्रह.

मूल्य पाच रुपये.

**स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय मराठी कविता**

संपादक
डॉ. प्रल्हाद वडेर
नरेंद्र बोडके

स्वातंत्र्योत्तर गोमंतकीय तरुण पिढीतील कवींच्या कवितांचा प्रतिनिधिक संग्रह. अभ्यासपूर्ण प्रस्तावनेसह.

मूल्य दहा रुपये

**गोमंत शारदा**

गोमंतकीय मराठी कविता
१५२६ ते १९६०

संपादक
रामदास प्रभू

इ. स. १५२६ ते १९६० पर्यंतच्या म्हणजे आद्य मराठी गोमंतकीय कवी कृष्णदास शामा ते बा. भ. बोरकर, शंकर रामाणी यांच्यापर्यंत गोमंतकीय मराठी कवितेची वाटचाल स्पष्ट करणारा प्रतिनिधीक कवितांचा वैशिष्ट्यपूर्ण संग्रह. सोबत अभ्यासपूर्ण प्रस्तावना.

मूल्य सात रुपये

**प्राप्तीस्थळ** : मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई ४. • बॉम्बे बुक डेपो, गिरगाव, मुंबई ४.